आपला महाराष्ट्र

# राज्य आणि देशातील भरकटलेली पंचायत राज व्यवस्था

तेहतीस वर्षांपूर्वी संविधानाच्या ७३ व्या दुरुस्तीतून आपल्या देशात पंचायतराज व्यवस्था बळकट व्हावी म्हणून गाव पातळीवर लोकशाही, विकास आणि सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन देण्यात आले होते. मात्र ते तीस वर्षानंतर मागे वळून बघताना ही व्यवस्था आपल्या मूळ उद्देशांपासून भरकटली की काय अशी शंका येण्या इतपत परिस्थिती सध्या आहे. राजकीय क्षेत्रातील हस्तक्षेप, आर्थिक भ्रष्टाचार अरे योजनांच्या संदर्भातील प्रशिक्षणाचा अभाव यामुळे ती कमकुवत झाली असे म्हणता येईल. पूर्वी गावात पंचायत होती. पंच परमेश्वर अशी त्या व्यवस्थेची संकल्पना होती पंचायत राज कायद्यातून पुन्हा प्रस्तावित व्हावी असा आराखडा तयार करण्यात आला होता. ग्रामसभा हा त्या आराखड्याचा प्राण होता. ती संकल्पना देखील संपुष्टात आलेली दिसते.भारतातील विद्यमान पंचायत राज व्यवस्था ही ग्रामीण स्वशासनाची एक महत्त्वाची प्रणाली आहे, जिला ७३वा संविधान दुरुस्ती अधिनियम १९९२ द्वारे संवैधानिक दर्जा प्राप्त झाला. ही दुरुस्ती २४ एप्रिल १९९३ पासून लागू झाली, ज्याचा उद्देश सत्तेचे विकेंद्रीकरण करणे आणि ग्रामस्तरावर लोकशाही सहभागाला सक्षम करणे हा होता. काल झालेल्या पंचायती राज दिनानिमित्त या व्यवस्थेवर प्रकाश टाकणे सयुक्तिक ठरेल. आपल्या जुन्या न्यायव्यवस्थेत गाव किंवा जमातीतील लोक एकत्र येऊन अनुभवी आणि समजदार व्यक्तींची पंचायत बसवून आपापसांतील अंतर्गत वादांचे निराकरण करीत असत. लोकशाही व्यवस्था आल्यावर देखील या परंपरेचे काही अवशेष आजही ब-याच ठिकाणी अस्तित्वात असलेले आढळतात.या पंचायतींचे निर्णय या भावनेने प्रेरित असत की सदस्यांनी समतोल दृष्टीने विचार करावा, त्यांचे मन, वचन आणि निश्चय एकसमान असावेत, ज्यामुळे समाजात समता आणि सुख-शांती टिकून राहील.

सुप्रसिद्ध हिंदी कादंबरीकार मुंशी प्रेमचंद यांनी आपल्या एका प्रसिद्ध कथेत पंच परमेश्वर पंचांना न्याय आणि धर्माचे प्रतीक मानले आणि त्यांना परमेश्वराची उपमा दिली. त्यांनी वर्णन केलेल्या कथानकात पंचांचा निर्णय अतिशय आदर्श असा आहे. अनेकांनी ही कथा वाचली असेल. आपल्या देशाला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले. देशाची राज्यघटना १९५० मध्ये लागू झाली. कालांतराने त्यात दुरुस्ती करण्याची वेळ आली. आवश्यकतेनुसार तशा दुरुस्त्या करण्यात आल्या. १९९२ मध्ये ७३ वी घटनादुरुस्ती झाली. त्यात पंचायतराज अधिनियम लागू झाला. या कायद्यानुसार ग्राम पातळीवर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पारदर्शी कारभार करणे, समाजातील दुर्बल घटकांना आणि विशेषतः महिलांना प्रतिनिधित्व देणे. गाव पातळीवर जी संसाधने आहेत त्यांचे न्याय वितरण करणे तसेच सर्वांगीण विकासाला आणि संमतेला प्रोत्साहन देणे. अशी एक चौकट पंचायती राज अधिनियमातून निश्चित करण्यात आली. महाराष्ट्रात शरदराव पवार मुख्यमंत्री असतानाच्या काळात विधेयकाच्या माध्यमातून महिलांना ३३ टक्के आरक्षण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लागू करण्यात आले. पुढे ते टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आले . आज ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद, पालिका आणि महानगरपालिकेत सहकारी संस्थांमध्ये महिला सदस्यांपासून महत्त्वाच्या पदांपर्यंत भागीदारी करीत आहेत. तरीही पंचायतराज व्यवस्थेत असलेल्या तरतुदीनुसार आणि त्यातील उद्देशानुसार ही व्यवस्था परिपूर्ण झाली का यावर प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. कारण मूळ भावनेपासून ही व्यवस्था भरकटलेली दिसते. जे काही राजकारण, वातावरण, व्यवहार, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये चालू आहे त्याचा आपण मूलतः विचार केलेला नाही. भरकटलेल्या व्यवस्थेची भलामणच आपण करीत आहोत. जणू काही अनैतिक कारभार हाच पंचायती राज व्यवस्थेचा आत्मा आहे असा विचार आपण स्वीकारलेला दिसतो. म्हणूनच पंचायती राज व्यवस्था भरकटलेली आहे असे आम्ही मानतो. निवडणुका होतात. लोकप्रतिनिधी निवडून जातात. परंतु विशिष्ट राजकीय पक्षांनी या संस्थांचा ताबा घेण्यासाठी जी कार्यपद्धती गेल्या काही वर्षांपासून राबविली आहे. त्यातून फारच कनिष्ठ दर्जाचे लोक, ज्यांना वैचारिक कुठलाही आगापिच्छा नाही असे निवडून पाठविले जात आहेत. त्यामुळे ही सगळी व्यवस्था सडली आहे.

अशी अपेक्षा होती की लोकप्रतिनिधी पक्षनिरपेक्षपणे काम करतील, सरपंच, जिल्हा परिषदेचे सदस्य, नगरपालिकेचे नगरसेवक, पंचायत समितीचे सदस्य विकासाचे आदर्श मॉडेल उभे करतील आणि लोकशाहीची स्वच्छ प्रतिमा ठरतील जेणे करून ते पुढे जाऊन विधानसभा आणि संसदेला सक्षम व प्रामाणिक नेतृत्व देऊ शकतील.पण तसे काही झाले नाही. एखादा अपवाद वगळता बहुतेकांना आपण या संस्थांमध्ये यथेच्छ चरण्यासाठीच निवडून आलो आहोत असे वाटते. लोकांनी देखील तीच भावना स्वीकारलेली आहे. ते देखील आपल्याला काही मिळते का किंवा निवडणुकीच्या निमित्ताने पाकीट तरी मिळेल का अशी एक लालची प्रक्रिया या देशात सुरू झालेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आपल्याला ते दिसले. नगरपालिकेची निवडणूक दिल्लीची राजकीय व्यवस्था हँडल करते यात सगळे काही आले. ज्या घरात पाकीट गेली त्या घरातून इमाने इतबारे विशिष्ट पक्षाला मते गेली. त्यामुळे रहिवासी क्षेत्रात जे काही जन सुविधेच्या संदर्भात अपेक्षित असते ते होत नाही. त्यासाठी आग्रह धरला जात नाही. आग्रह धरण्याचा अधिकार केव्हाच लोक गमावून बसले आहे. त्यामुळे राजकीय पक्षांच्या नेत्या कार्यकर्त्यांचे फावले आहे. या अवस्थेला पंचायत राज व्यवस्था येऊन थांबलेली आहे. केवळ थांबलीच नव्हे तर ती भरकटलेली आहे. तीच व्यवस्था विधान सभा म्हणजेच राज्या पासून देशापर्यंत पोहोचलेली आहे.

लोक पंचायत प्रतिनिधी ,भ्रष्ट आमदार, खासदार आणि मंत्र्यांनाच आपला आदर्श मानतात. यामुळे बहुतांश पंचायत राजकीय आणि सामाजिक वैरभाव तसेच आर्थिक अनियमिततेची केंद्रे बनून राहिली आहेत.

भारतात पंचायत राज व्यवस्था ही तळागाळातील लोकशाही मजबूत करण्याचे महत्त्वाचे साधन आहे. ही त्रिस्तरीय रचनेवर आधारलेली आहे. खालच्या स्तरावर म्हणजेच ग्राम पंचायत, मध्यम स्तरावर म्हणजे पंचायत समिती स्तरावर आणि जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद. अशी ही व्यवस्था आहे.या व्यवस्थेचे वैशिष्ट्य असे की सर्व स्तरांवर महिला तसेच अनुसूचित जाती-जमातींसह दुर्बल घटकांसाठी ५० टक्क्यांपर्यंत आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. ते लोक या संस्थांवर रितसर निवडून जातात.या पंचायतांना सक्षम करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय ग्रामीण विकास आणि पंचायती राज संस्था, राज्य स्तरावर पंचायत राज संचालनालय, राज्य ग्रामीण विकास संस्था तसेच विविध प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. याशिवाय केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांद्वारे तसेच वित्त आयोगांच्या माध्यमातून पुरेसा आर्थिक पुरवठा करून दिला जातो. थेट केंद्रातून पैसा येत असल्यामुळे आता ग्रामपंचायत च्या निवडणुकीत चुरस वाढली, आर्थिक व्यवहार वाढले आणि भ्रष्टाचार वाढले . ग्रामविकास, समृद्धी आणि आत्मनिर्भरतेसाठी कुशल मनुष्यबळ तयार करणे आवश्यक मानून त्या उद्देशाने पंचायतांना २९ विषयांवर काम देण्यात आले होते.त्यात कृषी विस्तार, जमीन सुधारणा, जल व्यवस्थापन, लघु आणि कुटीर उद्योग, अन्न प्रक्रिया, सामाजिक वनीकरण, पिण्याचे पाणी, गरीबी निर्मूलन, शिक्षण, आरोग्य, पोषण आणि स्वच्छता इत्यादींचा समावेश असून या सर्व क्षेत्राचे तीन तेरा वाजलेले आहेत. यास निवडून गेलेले लोकप्रतिनिधी जेवढे कारणीभूत आहेत किंवा जबाबदार आहेत तेवढेच निवडून देणारे लोक जबाबदार आहेत. दोघांपैकी कोणीही नैतिकता शाबूत ठेवलेली नाही म्हणूनच पंचायती राज व्यवस्था हातातून निसटली.

महिला प्रतिनिधींची स्थिती तर खूपच दयनीय आहे. त्या पूर्णांशाने बैठकीत सहभागी होऊ शकत नाहीत.त्यामुळे निर्णय प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावू शकत नाहीत. अनेक ठिकाणी त्यांची भूमिका केवळ निर्णयांवर स्वाक्षरी करण्यापुरती मर्यादित असते. प्रत्यक्षात निर्णय त्यांचे पती किंवा इतर प्रभावशाली व्यक्ती घेत असतात.यातून जर पंचायत राज व्यवस्था पुन्हा योग्य मार्गावर आणायची असेल, तर सरकार आणि नागरी समाजाने पुन्हा प्रामाणिक प्रयतक करणे आवश्यक आहे. यासाठी काही सुधारणा तातडीने आवश्यक आहेत. पंचायत प्रतिनिधींना योग्य प्रक्रियेद्वारे वार्षिक प्रशिक्षण देणे, समर्थन आणि देखरेखीत कुशल स्वयंसेवी संस्थांचा सहभाग व जबाबदारी निश्चित करणे, महिला पंचायत प्रतिनिधींसाठी स्वतंत्र प्रशिक्षण आयोजित करणे, सचिव आणि सीईओ यांच्या संगनमतावर कारवाई करणे, प्रशासकीय नियंत्रण कमी करणे, कामकाजात राजकीय हस्तक्षेप थांबवणे, पंचायतांच्या स्वतःच्या महसूल स्रोतांमध्ये वाढ करणे, केंद्र आणि राज्य स्तरावरून वेळेवर बजेट किंवा अनुदान देणे, सर्व कामांमध्ये ग्रामसभेच्या योग्य आयोजनाद्वारे सामुदायिक सहभाग आणि पारदर्शकता वाढवणे तसेच नवनव्या कल्पनांद्वारे विकास योजनांवर विशेष लक्ष केंद्रित करणे अशा पद्धतीने कारभार झाला तर ही व्यवस्था मजबूत होऊ शकते. त्यासाठी वैचारिक दृष्ट्या प्रकल्प असलेले आणि नीतिमान लोकप्रतिनिधींची आणि तशा लोकांना निवडून पाठविणाऱ्या मतदारांची आवश्यकता आहे. त्या स्तरापर्यंत नीतिमत्ता झिरपत जाणे गरजेचे आहे. ते कोण करेल हा प्रश्न असला तरी समाजातील स्वयंसेवी संस्था आणि स्वयंसेवी गट हे करू शकतात. मात्र परिस्थिती वेगळी आहे. कायम सत्तेत राहावे अशी इच्छा मागून असलेल्या राजकीय पक्षाने आपल्या अखत्यारित असलेल्या संघटना धार्मिक कर्मकांडासाठी आणि विभाजनासाठी कामाला लावलेल्या आहेत. लोकांना देखील आपण काय करीत आहोत ते कळत नाही. ते संमोहनात आहेत. उद्या त्या संमोहनाचा वापर करून देशात धार्मिक संकल्पनेतून सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयतक होईल. तो यशस्वी होईल त्यामुळे देशाचे संविधान संकटात येऊ शकते. याचा विचार येथील सर्वसामान्य व्यक्तींनी केला पाहिजे. पंचायत राज व्यवस्था हाच खरे तर पाया आहे. संसद आणि देशाचे मध्यवर्ती कारभारी हा कळस आहे. पाया जर कच्चा असेल तर मंदिराचा कळस केव्हाही कलंडेल. असा निसर्गाचा नियम आहे. यावर आपल्या देशातील लोक किती आणि केव्हा विचार करतील त्यावर सगळे अवलंबून आहे.

# माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियानातून सुदृढ व सुंदर गावांची निर्मिती करावी : पालकमंत्री रावल

**धुळे, दि.२४- माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियानाच्या माध्यमातून गावपातळीपर्यंत आरोग्य जनजागृती पोहोचवून सुदृढ व सुंदर गावांची निर्मिती करावी, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.**

राज्य शासनाच्या माझे गाव आरोग्य संपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी धुळे जिल्ह्यात जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी पालकमंत्री रावल दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे संबोधित करत होते. यावेळी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नेहा पवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.रविकांत सोनवणे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन बोडके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी स्वरांजली पिंगळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) अजय फडोळ, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. गिरीश पाटील, शिक्षणाधिकारी (योजना) प्रतिभा ठाकूर यांच्यासह गट विकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते.



पालकमंत्री रावल म्हणाले की, प्रजा निरोगी तर राज्य सुखी या ध्येयातून हे अभियान राबविण्यात येत आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून आणि गावापासून या अभियानाची सुरुवात करावी. प्रत्येक गाव आरोग्यदायी झाल्यास संपूर्ण जिल्हा आणि राज्य आपोआप सुदृढ बनेल. धुळे जिल्ह्याने या अभियानात राज्यात आदर्श निर्माण करावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी आरोग्य विभागाच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करत लोकांचे आरोग्य जपणे ही मोठी जबाबदारी असल्याचे सांगितले. जिल्हा आरोग्य संपन्न करण्यासाठी सर्वांनी सकारात्मक दृष्टीकोनातून एकत्रित प्रयतक करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सोनवणे यांनी जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, व स्त्री रुग्णालय यांच्या माध्यमातून सर्व सामन्य नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा आरोग्य संस्थांमार्फत गरीब व दुर्बल घटकांपर्यंत दर्जेदार सेवा पोहोचविण्याचा मानस व्यक्त केला.प्रास्ताविकात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांनी अभियानाची सविस्तर माहिती दिली.

## हृदया महाजन हिला बॅडमिंटन स्पर्धेत कांस्य

धुळे, दि.२३- शहरातील पी.एम. श्री केंद्रीय विद्यालयातील इ.८ वीची विद्यार्थीनी हृदया मयूर महाजन हिने चौदा वर्ष वयोगटातून पुणे येथे घेण्यात आलेल्या बॅडमिंटन स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावत कांस्य पदक मिळवले. खेळातील एकाग्रता आणि कौशल्य ओळखून निवड समितीने कन्याकुमारी येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी हृदया महाजन हिची निवड केली आहे. प्रशिक्षक डी.व्ही.पाटील, केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य प्रदीप पारखी, क्रिडा शिक्षक गावीत, तिचे वडील मयुर महाजन इंजि. मालेगाव मनपा, आई हेमा महाजन यांचे सहकार्य लाभले. राष्ट्रीय पातळीवर निवड झाल्याने हृदया महाजन हिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# जेईई मुख्य परीक्षेत पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या कनिष्ठ महाविद्यालयाचे घवघवीत यश

**शहादा, दि.२४ (का.प्र.)- नुकताच जाहीर झालेल्या जेईई मेन (२०२६) परीक्षेच्या निकालात पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवत घवघवीत यश संपादित केले आहे. निखिल चौधरी आणि मितेश पाटील या दोन विद्यार्थ्यांनी उच्चांकी गुण मिळवून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.**

देशभरातील प्रतिष्ठेच्या आयआयटी आणि एनआयटी सारख्या अभियांत्रिकी संस्थांमध्ये प्रवेशासाठी नॅशनल टेस्टिंग एजन्सीमार्फत घेण्यात आलेल्या या परीक्षेत निखिल किरण चौधरी याने ९९.१५९ पर्सेंटाइल गुण प्राप्त केले आहेत. त्याने इतर मागास प्रवर्गातून अखिल भारतीय पातळीवर ३३५० वा क्रमांक पटकावला आहे. तसेच मितेश ज्ञानेश्वर पाटील याने ९८.५३४ पर्सेंटाइल गुण मिळवत याच प्रवर्गातून ६३२९ वा क्रमांक मिळवला आहे. या दोन्ही विद्यार्थ्यांनी मजेईई ड्व्हान्सफ परीक्षेसाठी पात्र ठरून मोठी कामगिरी केली आहे.भारतातील अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील शिक्षणासाठी जेईई मुख्य परीक्षा ही सर्वोच्च मानली जाते. दरवर्षी दोन सत्रांमध्ये (जानेवारी आणि एप्रिल) ही परीक्षा घेतली जाते. या वर्षी देशभरातून लाखो विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. अशा अत्यंत चुरशीच्या परीक्षेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश वाखाणण्याजोगे आहे.यशवंत विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बापूसाहेब दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष जगदीशभाई पाटील, संस्थेचे समन्वयक प्रा.मकरंद पाटील, संचालक मयूर दीपक पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. के. पटेल, उपप्राचार्या प्रा. कल्पना पटेल, पर्यवेक्षक प्रा. के. एच. नागेश आणि प्रा. व्ही. सी. डोळे यांनी विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमाचे आणि मार्गदर्शकांचे कौतुक करत त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण पसरले आहे.



## मागील भांडणाचे कारण एकावर जीवघेणा हल्ला

धुळे, दि.२४- शहरातील म.गांधी पुतळा चौकात एका सदोतीस वर्षीय इसमावर मागील भांडणाच्या कारणावरून टोळीने पाठलाग करत कोयत्याने वार केल्याची घटना घडली.

भुषण राजेंद्र सुर्वे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.२१ एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या सुमारास आकाश गुजर, सोनु गुजर, पुरब गुजर तसेच त्याच्या सोबत असलेला पिवळ्या रंगाचा शर्ट घातलेला अनोळखी अशा बारा ते तेरा जणांनी फिर्यादीचा पाठ केला. गांधी चौकातील मेडीकल जवळ गाठून आकाश गुजर याने शिवीगाळ केली, यावेळी पुरब गुजर याने हातातील कोयत्याने जीवघेणा हल्ला केला. पुढील तपास पोलिस करत आहेत.




## संघाचे माधव यांच्यामुळे भाजप सरकार अडचणीत

नवी दिल्ली, दि. २४ : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या इराण आणि रशियाकडून तेल न खरेदी करण्याच्या मागणीपुढे भारताने नमते घेतले आहे. त्यानंतर पन्नास टक्क्यांचा प्रारंभिक कर स्विकारला आहे, हे अमेरिकेच्या राजधानीत जागतिक प्रेक्षकांसमोर कबूल करून भारतीय जनता पक्षाच्या सरकारला अडचणीत आणल्यानंतर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सर्वात प्रमुख चेहऱ्यांपैकी एक असलेल्या राम माधव यांना तातडीने माघार घेऊन आपण चुकीचे होतो, असे म्हणण्यास भाग पाडले आहे.

यापूर्वी, वॉशिंग्टन डी. सी. येथील हडसन इन्स्टिट्यूटने आयोजित केलेल्या न्यू इंडिया कॉन्फरन्स मधील एका पॅनल चर्चे त बोलताना माधव म्हणाले होते; भारताने इराणकडून तेल खरेदी थांबवण्यास सहमती दर्शवली. आमच्या विरोधी पक्षांकडून इतकी टीका होऊनही आम्ही रशियाकडून तेल खरेदी थांबवण्यास सहमती दर्शवली. भारताने जास्त काही न बोलता पन्नास टक्के शुल्काला सहमती दिली. मग अमेरिकेसोबत काम करण्यासाठी भारत नेमके कुठे कमी पडत आहे? भारताने अमेरिकेपुढे माघार घेतल्याची राम माधव यांची सुरुवातीची कबुली विश्वस-नीय ठरते. कारण, त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघात परराष्ट्र धोरणावर बोलण्यासाठी सर्वात पात्र व्यक्ती मानले जाते. त्यांचे अलीकडील पुस्तक, द हिंदुत्व पॅराडाइमम, हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जागतिक दृष्टिकोनाचे नवीनतम विवेचन मानले जाते आणि ते संघातील जागतिक घडामोडींसाठी सर्वात विश्वासार्ह व्यक्ती म्हणून माधव यांची प्रतिष्ठा वाढवते.

## शब्दकोडे क्रमांक : २३४९




**आडवे शब्द :** १.देवतांना केलेली आवळणी, प्रार्थना ३.लोभी ५. मनन ७.पंथ ८.संजय दत्त सिनेमा ९.एक नक्षत्र ११.पोपट १२.मिथुन चक्रवती यांचा एक चित्रपट १४.एक हिंदी सिनेमा ** दिलदारा १६.प्रामाणिकपणा १९.रुबाब २०.दणकट २१.जगातील सर्वात प्रसिद्ध धबधबा २४.तडक २६.इंग्लिशमध्ये-पैसे २८.पठण २९.कुटील डाव ३१.खारट ३२. रायगडावरील एक डोंगरकडा ३५.धोबी ३८.वन ३८.चारपाई ४१.लाज ४५. नौका ४६. भारतातील एक प्रसिद्ध राजा ४९.वाहन चालवणारा ५१.घुंगरू ५२.अधिक ५३.हिंदीत-इज्जत

**उभे शब्द :** १.विश्राम २.इंग्रजीत- मध ३.हस्त ४.एक तोंडी लावण्याचा पदार्थ ५.विस्तव-हिंदीत ६. जहाज ७.मुलीचा नवरा १०.जखमी १२.निःस्वार्थ दिलेली देणगी १३.घनदाट १५.दणकट १७.एक मराठी महिना १८ एक पेय १९.जागा २०.सुक्या मेव्यातील एक पदार्थ २१.नाट्य २२.भेट २३.वाचन करणारा २५.दहा आणि तीन मिळून तयार होणारी संख्या २७.व्यवस्थित २८.ब्राह्मण ३०.उलट लिहा-पट ३१.चारपाई ३३.जादू ३४.बट्टा ३६.धाग्याची गुंडी ३७.पत्ते ४०.गुंतागुंतीचा ४२.रसरशीत ४३.सोबत ४४.धनी ४७.एक सुगंधी वनस्पती ४८.आकाश ५०.हिंदीत-उंची

**शब्दकोडे क्रमांक : २३४८ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | न | य | | ख | त | | शं | | का | ल | वा |
| हं | | म | ह | ल | | प | ख | वा | ज | | दी |
| ग | ड | | ल | | ता | रा | | ह | ळ | वा | |
| | ब | क | वा | स | | गं | ध | क | | द | र |
| सं | के | त | | खा | स | दा | र | | मा | ळ | |
| सा | | ल | ढा | | म | | प | त | न | | घे |
| र | मा | | ल | त | | पा | क | ळी | | मी | रा |
| | ती | ल | | री | स | | ड | रा | व | | व |
| म | | हा | क | | जा | डा | | म | | छं | |
| स | द | न | | ता | | वा | री | | उ | द | र |
| ला | ख | | डा | ल | डा | | घ | रा | णे | | क |
| | ल | क | ब | | स | र | | ग | | दा | म |

प्रकाश में आज
ऐलान









# आपला महाराष्ट्र

शनिवार २५ एप्रिल २०२६ पान ३


## धुळ्यात ३० एप्रिल रोजी प्रचार मेळाव्याचे आयोजन

धुळे, दि.२४- सामाजिक न्याय विभाग तसेच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत गुरुवार, दि.३० एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सिंचन भवन मागे, साक्री रोड, धुळे येथे प्रचार व प्रसार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक गोकुळदास पगारे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. महामंडळामार्फत मांग तसेच समाजातील १२ पोट जातीच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात योजनांचा लाभ, पात्रता अटी तसेच अर्ज प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. उपस्थितीचे आवाहन सहाय्यक आयुक्त संजय सैंदाणे व गोकुळदास पगारे यांनी केले आहे.

## आपचे दहा पैकी सात खासदार भाजपात भाजपकडून जनतेशी पुन्हा धोका : केजरीवाल

**नवी दिल्ली : आम आदमी पार्टीच्या (आप) राज्यसभेतील सात खासदारांनी भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी एका ओळीत प्रतिक्रिया दिली आहे. अरविंद केजरीवाल यांनी सात खासदारांचा उल्लेख केला नाही. पण, केजरीवालांच्या प्रतिक्रियेत पंजाब आणि भाजप उल्लेख आहे. भाजपने पुन्हा एकदा पंजाबच्या जनतेला धोका दिला, असे केजरीवाल म्हणाले. राघव चड्ढा यांच्यासह इतर सहा खासदार भाजपमध्ये विलीन झाले आहेत. पत्रकार परिषद घेत राघव चड्ढा यांनी भाजपमध्ये विलीन होत असल्याचे म्हटले आहे. यानंतर आम आदमी पार्टीकडून राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल राज्यसभा खासदार संजय सिंह आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत.**

आपचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी पक्षाच्या फुटलेल्या खासदारांचा प्रतिक्रियेत कुठेही उल्लेख केला नाही. केजरीवालांच्या पोस्टमध्ये भाजप आणि पंजाबचा उल्लेख आहे. भाजपने पंजाबला पुन्हा धोका दिला, असे म्हणत केजरीवालांनी



फुटलेल्या खासदारांना अनुल्लेखाने मारण्याचा प्रयत्न केल्याचे पाहायला मिळाले. आज आम आदमी पार्टीच्या सात खासदारांना फोडून भाजपमध्ये सामील केले. ही सात नावे पंजाबच्या जनतेने लक्षात ठेवावीत. पंजाबसोबत गद्दारी करणाऱ्यांना पंजाबची जनता माफ करणार नाही. राघव चड्ढाला पार्टीने (पान ८ वर)

## तपनभाई मुकेशभाई पटेल मेमोरियल हॉस्पिटलचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आज उद्घाटन

**शिरपूर, दि.२४- संपूर्ण उत्तर महाराष्ट्र तसेच मध्य प्रदेश आणि गुजरातच्या सीमावर्ती भागातील नागरिकांना उच्च दर्जाच्या अत्याधुनिक आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी देशातील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था श्री विलेपार्ले केळवणी मंडळ (एस.व्ही.के.एम.) अंतर्गत खर्दे बु.ता.शिरपूर जि.धुळे येथे तब्बल १२०० बेडचे एसव्हीकेएम संचालित तपनभाई मुकुंशभाई पटेल मेमोरियल हॉस्पीटल व रिसर्च सेंटर उभारण्यात आले असून शनिवारी, २५ एप्रिल रोजी या रुग्णालयाचे उद्घाटन मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येत आहे.**

यावेळी मंत्री हसन मुश्रीफ, मंत्री गिरीष महाजन, पालकमंत्री ना.जयकुमार रावल, मंत्री संजय सावकारे तसेच माजी







मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आ. चंद्रकांत रघुवंशी, आ.काशिराम पावरा, आ.राजेश पाडवी, आ.अनुप अग्रवाल, आ.सौ.मंजुळाताई गावित, आ.राम भदाणे, आ.आमश्या पाडवी, माजी खासदार डॉ.सुभाष भामरे, माजी खासदार डॉ.हिनाताई गावित, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, माजी आमदार कुणाल पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष रामकृष्ण खलाणे, धुळे महापौर सौ.मायादेवी परदेशी, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील अनेक मान्यवर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

१२०० बेडचे अत्याधुनिक हॉस्पीटल : शिरपूर येथे उभारण्यात आलेले तब्बल १२०० खाटांची क्षमता असलेले हे रुग्णालय उत्तर महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरात यांना जोडणारे एक महत्वाचे आरोग्यसेवा केंद्र ठरणार आहे. रुग्णांना या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असलेल्या रुग्णालयात आरोग्यसेवा घेण्याचा लाभ घेता येणार आहे. नाशिक, धुळे, जळगाव नंदुरबारच्या भागातील आदिवासी, गोरगरीब आणि शेवटच्या घटकांना उपचारासाठी इतरत्र धाव घेण्याचा त्रास दूर होऊन त्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेष म्हणजे सर्वांना समान उपचार हे या रुग्णालयाचे ब्रीदवाक्य असून यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या रुग्णांनाही येथे कॅशलेस आरोग्य सेवेचा लाभ घेता येईल.

तपनभाई पटेल रुग्णालयाची वैशिष्ट्ये : १२०० बेडच्या रुग्णालयात तज्ञ डॉक्टर आणि विशेषज्ञांची नेमणूक करण्यात आली असून अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ, सामान्य वॉर्ड (पुरुष व महिला), ट्विन शेअरिंग रूम, सिंगल प्रायव्हेट रूम अशी व्यवस्था आहे. क्रिटिकल केअर विभागात आयसीयू १५० हून अधिक बेड, एनआयसीयू २८ बेड, पीआयसीयू २० बेड उपलब्ध करून (पान ८ वर)

## दोन लाखांहून अधिक रकमेचे दागिने लंपास

धुळे, दि.२४- शिरपूर तालुक्यातील खामखेडा प्र.था. येथील राहत्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून घरातील दोन लाख तीस हजार रूपये किंमतीचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. ज्ञानेश्वर भालेराव पाटील यांनी दि.२३ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, खामखेडा गावातील राहत्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने दि.२१ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास घरात प्रवेश केला. घरातील सामान अस्ताव्यस्त फेकून कपाट व सुटकेसमधील दोन लाख तीस हजार रूपये किंमतीचे सोने, चांदीचे दागिने चोरून नेले. याप्रकरणी शिरपूर शहर पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## पवन ऊर्जा प्रकरणात अखेर शेतकऱ्यांचा विजय प्रशासनाकडून तातडीने मोबदला देण्याचे आदेश

**नंदुरबार, दि.२४ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील पूर्व भागातील आदिवासी व मागासवर्गीय शेतकऱ्यांच्या जमिनीवर पवन ऊर्जा प्रकल्पासाठी झालेल्या कथित अतिक्रमण प्रकरणात अखेर प्रशासनाने कडक भूमिका घेत शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे दीर्घकाळ चाललेल्या संघर्षाला यश मिळाले आहे.**

गेल्या सुमारे २० वर्षांपासून सुजलॉन कंपनीकडून शेतकऱ्यांच्या जमिनीवर परवानगीशिवाय पोल उभारणे, रस्ते तयार करणे व प्रकल्पासाठी जमीन वापरणे सुरू असल्याचा आरोप स्थानिक आदिवासी शेतकऱ्यांनी केला होता. या विरोधात पवन ऊर्जा आदिवासी मागासवर्गीय शेतकरी संघर्ष समितीने सातत्याने आंदोलन, मोर्चे व निवेदनांद्वारे आवाज उठवला.या आंदोलनाचे नेतृत्व समितीचे अध्यक्ष अरुण रामराजे यांनी केले. या प्रकरणात सुमारे ३०० ते ४०० आदिवासी शेतकरी बाधित झाल्याचे सांगितले जाते. शेतकऱ्यांचा आरोप होता की कंपनीने ना पूर्वपरवानगी घेतली, ना शासनाची अधिकृत मंजुरी, तरीही जमिनींचा वापर सुरू ठेवला.शेतकऱ्यांच्या पाठपुराव्यानंतर जिल्हाधिकारी स्तरावर या प्रकरणाची दखल घेण्यात आली. ६ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या सुनावणीनंतर तहसीलदार, नंदुरबार यांना कारवाईचे निर्देश देण्यात आले होते. त्यानंतर २४ जून २०२५ रोजी आदेश देत संबंधित कंपनीने अतिक्रमण हटवावे किंवा रेडीरेकन दराने नुकसानभरपाई द्यावी, असे स्पष्ट करण्यात आले.मात्र आदेशानंतरही ८ ते ९ महिने मोबदला न मिळाल्याने शेतकऱ्यांनी पुन्हा आंदोलन छेडले. यापूर्वी (पान ८ वर)

## मालट्रकची ॲपेला धडक; दोघे ठार

धुळे, दि.२४- शिरपूर शहरातील हॉटेल आरती समोर भरधाव वेगाने जाणाऱ्या मालट्रकने ॲपेरिक्षाला धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोन जणांची गंभीर जखमी होवून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मुकुंदा तुकाराम शिरसाठ यांनी दि.२३ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, शिरपूर तालुक्यातील हिसाळे गावाहून शिरपूरकडे भरधाव वेगाने जाणारा मालट्रक क्र.डीडी०१/जी-९७५२ हॉटेल आरती समोरून जात असतांना ॲपेरिक्षा क्र.एमएच१८/डब्ल्यू-७५१५ ला उजव्या बाजूने धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात ॲपेरिक्षामधील मनिषा राजेंद्र पाटील रा.पिंपळखेड, चाळीसगाव व बंटी किसन परदेशी रा.हिसाळे हे दोघे ठार झाले.

## सोनगीरजवळ महामार्ग खचल्याने पिकअप उलटली मृत कोंबड्या पळविण्यासाठी नागरिकांची तोबा गर्दी

**सोनगीर दि.२४ (प्रतिनिधी) - जामफळ कनोली प्रकल्पांतर्गत जलवाहिनी टाकण्याचे काम सध्या वेगात सुरू आहे. मात्र, हे काम करताना सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचे समोर आले असून, शुक्रवारी (दि. २४) पहाटे मुंबई-आग्रा महामार्गाचा काही भाग खचल्याने अपघात झाला. या अपघातात जिवंत कोंबड्यांची वाहतूक करणारी पिकअप उलटून सर्व पक्षी जागीच ठार झाले, तर काही नागरिकांनी मृत कोंबड्या पळवून नेल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.**



सोनगीर कडून शिरपूर कडे जाताना सोनगीर पासून काही अंतरावर मुंबई-आग्रा महामार्ग न खोदता महामार्गाला मोठे छिद्र पाडून त्यातुन जलवाहिनी टाकण्याचे काम बाभळे जुन्या रस्त्याजवळ सुरू आहे. मात्र, गुरुवारी पहाटे अचानक या ठिकाणी महामार्गावर मोठा खड्डा पडला. याच वेळी महामार्गावरून जाणाऱ्या एका चिकन वाहू पिकअपचे चाक या खड्ड्यात फसल्याने वाहन उलटले. या अपघातात वाहनातील सर्व कोंबड्या (पान ८ वर)



## नारी शक्ती वंदन विधेयकावर हिना गावितांकडून भूमिका स्पष्ट

**धुळे, दि.२४- शहरातील चाळीसगाव चौफुली येथील स्व. महादेव अंपळकर स्मृती भाजपा जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात आज नारी शक्ती वंदन विधेयक २०२६ या विषयावर माजी खासदार हिनाताई गावित यांनी विधेयकाच्या विविध तांत्रिक व धोरणात्मक बाबींचा सखोल आढावा घेत महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाच्या दृष्टीने या विधेयकाचे महत्त्व अधोरेखित केले.**

या विधेयकाद्वारे लोकसभा तसेच राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या जनगणना व मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेबाबतही त्यांनी सविस्तर माहिती दिली. महिलांना राजकीय मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हे विधेयक ऐतिहासिक पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी विरोधकांवर टीका करताना गावित म्हणाल्या की, अनेक वर्षे सत्तेत राहूनही महिलांच्या सक्षमीकरणासाठी ठोस पावले न उचलणारे विरोधक आज महिलांच्या नावाखाली केवळ राजकारण करत आहेत. या विधेयकाला विरोध करून त्यांनी महिलांच्या प्रगतीला अडथळा निर्माण करण्याचा प्रयतक केला आहे. भाजपाने नेहमीच महिला सशक्तीकरणासाठी सातत्याने प्रयत्न केले असून, भविष्यातही महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी पक्ष कटिबद्ध राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, आमदार अनुप अग्रवाल, महापौर सौ.मायादेवी परदेशी, उपमहापौर सौ. ज्योत्स्ना पाटील, चंद्रकांत सोनार, सौ.प्रतिभाताई चौधरी, सौ.जयश्रीताई अहिरराव, स्थायी समिती सभापती लताबाई सोनार, डॉ.सुशील महाजन उपस्थित होते.

## अश्लिल शिवीगाळ प्रकरणी आ.गायकवाडांचा राजीनामा घ्या : भाकप

**धुळे, दि.२४– प्रकाशक आंबी यांना आ.संजय गायकवाड यांनी केलेली शिवीगाळ ही लोकशाही मुल्यांना आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला बाधा आणणारी आहे. आ.संजय गायकवाड यांनी भुतकाळातही अशा स्वरूपाची गुन्हेगारी कृत्ये केली आहेत. त्यांचे वर्तन हे आमदार म्हणून अशोभनीय आणि महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला कलंकीत करणारी आहे. त्यामुळे आ.गायकवाड यांनी तातडीने राजीनामा द्यावा. अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या जिल्हा शाखेने केली आहे. या बाबत पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन दिले आहे.**



आ.संजय गायकवाड यांनी गोविंद पानसरे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन प्रशांत आंबी यांना फोन करून अश्लील शिवीगाळ केली. त्याचे सर्वत्र पडसाद उमटत आहेत. भाकपाच्या जिल्हा शाखेच्या शिष्टमंडळाने या संदर्भात मुख्यमंत्र्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन दिले. कम्युनिस्ट पक्षाचे विचारवंत गोविंद पानसरे यांनी शिवाजी कोण होता, या पुस्तकात इतिहासाचा चिकित्सक आणि अभ्यासपूर्ण दृष्टीकोन मांडला आहे. त्यात त्यांनी शिवाजी महाराजांच्या विवेकी आणि पुरोगामी विचारांचे विश्लेषण केले आहे. वैज्ञानिक दृष्टी समता आणि ऐतिहासीक सत्य जाणून घेण्याची प्रेरणा पानसरे यांनी या पुस्तकातून शब्दबध्द केली आहे. या अगोदर १९२६ मध्ये प्रबोधनकार ठाकरेंनी असेच चिकित्सक पुस्तक दगलबाज शिवाजी या नावाने लिहीले आहे. या शिवाय गणेश कुऱ्हाडे यांनी देखील १९३९ मध्ये शिवाजी कोण होता हे पुस्तक लिहीले होते. असे असतांना कोरटकर, गोविंद गिरी, सोलापूरकर, भगतसिंग कोशारी हे छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करतात तेव्हा संजय गायकवाडसारखे लोक हेतुत: मुग गिळून बसतात. गायकवाड यांनी प्रशांत आंबी यांना शिवीगाळ करतांना जाती जातीत तेढ निर्माण होईल असे वक्तव्य केले. त्यांचे वक्तव्या निंदनीय आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी आ.गायकवाडांचा राजीनामा घ्यावा. अश्लिल वक्तव्य केल्याबद्दल गंभीर कलमांच्या आधारे गुन्हा (पान ८ वर)



## दुकानांची जागा वाढवून मिळण्यासाठी चर्मकार समाजाची प्रशासनाकडे मागणी

**शहादा, दि.२४ (का.प्र.)- शहादा शहरातील खेतिया रोड चार रस्ता परिसरात गेल्या ५० वर्षांपासून पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या चर्मकार समाज बांधवांनी आपल्या व्यवसायाची जागा वाढवून मिळावी, या मागणीसाठी पालिकेच्या उपनगराध्यक्षा सौ.माधवीताई मकरंद पाटील यांना शुक्रवारी सविस्तर निवेदन दिले. चर्मकार समाजाचे अध्यक्ष आणि सचिवांच्या प्रमुख उपस्थितीत हे निवेदन सादर करण्यात आले.**

शहादा शहरातील खेतिया रोड चार रस्ता भागात, पाण्याच्या टाकीच्या दक्षिण दिशेला चर्मकार समाजाची बूट-चप्पल दुरुस्ती आणि विक्रीची छोटी दुकाने आहेत. ही दुकाने साधारण ४४ क्षेत्रफळाची असून, समाज बांधव गेल्या ५० वर्षांपासून या ठिकाणी आपला वडिलोपार्जित व्यवसाय करत आहेत. या बदल्यात ते नियमितपणे नगरपालिकेकडे कर भरणा देखील करत आले आहेत. मात्र, सध्याची ४ बाय ४ ची जागा व्यवसायासाठी अत्यंत अपुरी पडत असल्याने व्यावसायिकांची मोठी कुचंबणा होत आहे.निवेदनात नमूद केल्यानुसार, जागेच्या कमतरतेमुळे व्यावसायिकांना आपले साहित्य ठेवण्यास अडचण येत आहे. दुकाने अत्यंत लहान असल्याने ग्राहकांना रस्त्यावर उभे राहून सेवा घ्यावी लागते. यामुळे उन्हापावसाचा त्रास तर होतोच, शिवाय रस्त्यावर वाहने उभी राहिल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. (पान ८ वर)



## वाढलेल्या मतदारांची आयोगाने चौकशी करावी- किरीट सोमय्या

**धुळे, दि .२४- सिस्टीमॅटीक इंटेन्सीव्ह रिव्हीजन अर्थात एस.आय.आर.च्या माध्यमातून मतदार यादीत महाराष्ट्रात पन्नास लाख बनावट, घुसखोर मतदारांचा समावेश आहे. मुस्लीमांचे तीनपट वाढलेले मतदान ही चिंतेची बाब आहे. निवडणुक आयोगाला विनंती केली आहे की, बनावट मतदारांची स्वतंत्र चौकशी करावी, धुळ्यात बावीस हजार मतदार मालेगावातील आहेत. दोन्ही ठिकाणी नोंद असलेल्या मतदारांची नावे केवळ एकाच ठिकाणी असायला हवीत. यासाठी धुळे व मालेगाव च्या जिल्हाधिकाऱ्यांना मतदारांची नावे दोन ठिकाणी दिसायला नकोत. या बाबत सांगण्यात आल्याची माहिती भाजपाचे किरीट सोमय्या यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

पत्रकार परिषदेप्रसंगी किरीट सोमय्या यांच्यासमवेत आ.अनुप अग्रवाल, माजी खा.डॉ.सुभाष भामरे, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्सना पाटील, स्थायी समिती सभापती लताबाई पोतदार, भाजपा जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर उपस्थित (पान ८ वर)

## विष प्राशन केले इसमाचा मृत्यू

धुळे, दि.२४- धुळे तालुक्यातील हरणमाळ येथील एकोणचाळीस वर्षीय इसमाने काही तरी विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, धुळे तालुक्यातील जापी ह.मु.हरणमाळ येथील रहिवासी अशोक केवळ मोरे (वय ३९) यांनी दि.२१ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास चितोड शिवारात काही तरी विषारी औषध प्राशन केले. अत्यवस्थ स्थिती अनिल लांडे, सचिन गायकवाड यांच्या मदतीने सिव्हील हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले असता दि.२२ एप्रिल रोजी रात्री दहा वाजता उपचारादरम्यान अशोक मोरे यांची प्राणज्योत मालवली.

## नंदुरबार अवैध दारू वाहतुकीवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नंदुरबार दि.२४ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात अवैध दारू वाहतुकीवर स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत सुमारे २८,८७,३६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक पांढऱ्या रंगाचा पिकअप वाहन (एम एच १४ जी डी ७४९७) मध्ये विदेशी दारू भरून गुजरात राज्यात चोरटी वाहतूक केली जाणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पथकाने शहादा शहराजवळील शिरूड चौफुली परिसरात सापळा रचला. सकाळी सुमारे ५:३० वाजता संशयित वाहन येताना दिसल्याने त्याला थांबवून तपासणी करण्यात आली. वाहनचालकाकडे चौकशी केली असता तो समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही.

तपासणीदरम्यान वाहनामध्ये मोठ्या प्रमाणावर अवैध दारू साठा आढळून आला. त्यानुसार पोलिसांनी वाहनासह एकूण २८ लाख ८७ हजार ३६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी संबंधित वाहनचालकाविरोधात शहादा पोलीस ठाण्यात (पान ८ वर)


**५ वे पुण्यस्मरण**



**स्व.श्री.नानासो. प्रकाश दामोदर मराठे**

मृत्यू दि.२५/०४/२०२१

*काळाचा महिमा काळच जाणे।*
*कठीण तुमचे अचानक जाणे ।*
*आजही घुमतो स्वर तुमचा कानी ।*
*तुमच्या प्रतिमेला श्रध्दांजली वाहतांना*
*डोळ्यात येते पाणी ।*

: शोकाकुल :

श्रीमती सुनिता प्रकाश मराठे
श्री.अभिजीत प्रकाश मराठे
सौ.दीपाली अभिजीत मराठे

फर्मस्

अभिजीत मेडिकल्स्
आर्या फार्मसी, ग.नं.४, धुळे



**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,39,700 रु.+3% GST
सोने- 24 K -1,52,500 रु.+3% GST
चांदी- 2,49,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३


## धुळे जिल्हा वकील संघ निवडणूक : ऐंशी टक्के मतदान



**धुळे, दि.२४ - धुळे जिल्हा वकील संघाच्या २०२६ -२०२८ निवडणुकीसाठी आज मतदान प्रक्रिया अत्यंत उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सकाळी ८ ते ५ सायंकाळी या वेळेत मतदान झाले. एकूण १०३९ मतदारांपैकी सुमारे ८०% मतदान झाल्याने वकिली वर्गाचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. दिवसभर शांत, संयमी आणि व्यावसायिक वातावरणात मतदान पार पडले, ही विशेष बाब ठरली.**

या निवडणुकीत एकूण ४१ उमेदवारांचे नशीब मतपेटीत बंद झाले असून त्यापैकी १७ उमेदवार विजयी होणार आहेत. त्यामुळे प्रत्येक मताला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चुरशीच्या लढतीनंतर आज मतदानाची प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली असून, आता सर्वांचे लक्ष उद्या दि.२५ एप्रिल रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागले आहे. विजय कोणाचा होणार, कोणते पॅनल बाजी मारणार आणि कोणत्या उमेदवारांचे राजकीय समीकरण जुळणारयाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

## तीन लाखांच्या सोयाबीनची परस्पर विक्री; गुन्हा दाखल

धुळे, दि.२४- शहरातील अवधान एम.आय.डी.सी.मधील रेणुका ट्रान्सपोर्ट येथून तीन लाख अकरा हजारांचे सोयाबीनची परस्पर विक्री करून ट्रक रेणुका ट्रान्सपोर्ट येथे सोडून गेलेल्या इसमा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शरद रामदास गायखे यांनी दि.२३ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, अवधान एम.आय.डी.सी.येथील रेणूका ट्रान्सपोर्ट येथे ट्रक क्र. एमएच १५/जे सी-७२५२ मध्ये तीन लाख अकरा हजार रूपये किंमतीचे सोयाबीन होते. दि.२१ ते २४ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सुधीर ईश्वर जावीर रा. सावता वाडी, कोल्हाद खुर्द, जि.अहिल्यानगर याने सोयाबीनचे परस्पर विक्री करून ट्रक एम.आय.डी.सी. अवधान येथील रेणुका ट्रान्सपोर्ट येथे सोडून निघून गेला. या प्रकरणी मोहाडी नगर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**जांभुळ ज्युस मिळेल**




नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या जांभळा पासून तयार केलेला रस (ज्युस) उपलब्ध आहे. कोणताही रंग, संरक्षक (प्रिर्झव्हेटीव्ह), पाणी न टाकता बनवलेला जांभळाचा शुद्ध रस (ज्युस) 200.MLच्या काचेच्या बाटलीत उपलब्ध आहे.

संकेत नित्या फार्म

जनशक्ती बिल्डींग दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग- धुळे. ०२५६२-२३५३१६, २३८३१६



# कठोर परिश्रम, आत्मविश्वासाच्या जोरावर कोणतीही परीक्षा आपण उत्तीर्ण होऊ शकतो : नगराध्यक्ष पाटील

**शहादा, दि.२४ (प्रतिनिधी)- स्पर्धा परीक्षा या आजच्या काळात खूप महत्त्वाच्या झाल्या आहेत. त्यात यश मिळवण्यासाठी फक्त हुशारी पुरेशी नसते, तर सातत्यपूर्ण अभ्यास आणि प्रामाणिक मेहनत आवश्यक असते.**

लहानपणापासूनच मुलांनी अभ्यासाची सवय लावून घेतली, तर त्यांना पुढे स्पर्धा परीक्षांची तयारी करणे सोपे जाते. अपयश आले तरी निराश न होता पुन्हा प्रयतक करणे हीच खरी यशाची गुरुकिल्ली आहे. कठोर परिश्रम आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर कोणतीही परीक्षा आपण उत्तीर्ण होऊ शकतो. म्हणूनच, सातत्य, शिस्त आणि मेहनत या गुणांचा आपल्या जीवनात समावेश करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन शहाद्याचे लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी केले. येथील विकास प्रतिष्ठान संचलित विमलाई करिअर अकॅडमी अंतर्गत घेण्यात आलेल्या विकास टॅलेंट सर्च परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा येथील विश्राम काका पाटील शैक्षणिक संकुलात पार पडला त्यावेळी श्री पाटील अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी तालुका एज्युकेशन संस्थेचे उपाध्यक्ष हिरालाल पटेल, विकास प्रतिष्ठानचा अध्यक्षा प्रीती पाटील, संस्थेचे तज्ञ संचालक प्रा.एस. पी.पाटील, पालक, संस्थेच्या विविध विद्या शाखांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक उपस्थित होते. सध्याच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात टिकून राहावा बालवयापासूनच त्याला स्पर्धा परीक्षेची गोडी निर्माण व्हावी यासाठी तालुका एज्युकेशन संस्थेच्या विविध विद्या शाखांमध्ये विकास प्रतिष्ठान मार्फत यंदा प्रथमच विकास टॅलेनुसार परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण विद्यार्थ्यांची पाठांतराव व्यतिरिक्त विचार करण्याची क्षमता वाढावी स्पर्धात्मक मानसिकता विकसित व्हावी मोठ्या शहरातील इतर विद्यार्थ्यांबरोबर भविष्यात स्पर्धेत टिकून स्पर्धात्मक परीक्षांसाठी बालवयातच प्रेरणा मिळावी यासाठी इयत्ता पहिली ते दहावीच्या सुमारे २३६० विद्यार्थ्यांनी व्हिटीएस परीक्षा दिली होती.

यावेळी संस्थेच्या शहादा, प्रकाशा, कहाटूळ, फेस व वडाळी या पाचही विद्या शाखांमधील इयत्ता पहिली ते चौथीच्या ६१० व पाचवी ते दहावीच्या १७५० असे एकूण २३६० विद्यार्थ्यांनी एकाच दिवशी, एकाच वेळी कॅमेराच्या निगराणीत भयमुक्त वातावरणात प्रथमच व्हीटीएस स्पर्धा परीक्षा दिली होती. या परीक्षेत इयत्ता निहाय प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पालकांसमवेत गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उज्वला गुजर यांनी तर सूत्रसंचालन चंद्रमणी रायसिंग यांनी केले. यशस्वीतेसाठी व्हिटीएस टीमने सहकार्य केले.

# आंबी यांना शिवीगाळ केल्याबद्दल दिलगीरी व्यक्त करतो पण भुमिकेवर ठाम : आ.गायकवाड यांचे स्पष्टीकरण

**बुलढाणा, दि.२४- शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता, या पुस्तकाचे प्रकाशन करणाऱ्या प्रशांत आंबी यांना फोन करुन शिवागाळ केली. शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख का करतो, असे म्हणत धमकीही दिली. पण, आमदार संजय गायकवाड यांनी पुस्तक वाचले नसून त्यांना छत्रपती शिवराय कळालेच नाहीत, असे म्हणत समाज माध्यमांवरुन त्यांच्यावर टीकेची झोड उठली. राजकीय नेत्यांनी देखील सावध भूमिका घेतल्यानंतर आता आमदार गायकवाड यांनी प्रकाशक आंबी यांना केलेल्या शिवीगाळ बद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे. पण, छत्रपती शिवाजी महाराज, असा उल्लेख करण्याच्या मतावर आपण ठाम असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.**

शिवाजी कोण होता या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना आमदार संजय गायकवाड यांनी फोनवरुन अश्लील शिवीगाळ केली. सोशल मिडियावर या घटनेवरुन संजय गायकवाड यांच्या भूमिकेवर अनेक प्रश्न विचारण्यात आले. तर, प्रकाशक प्रशांत आंबी यांनीही पोलिसात जाऊन तक्रार देण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांची तक्रार घेण्यात आली नाही. तसेच, महायुतीमधील राजकीय नेत्यांनी देखील त्यांच्या फोनबद्दल सावध भूमिका घेतली. अखेर, शिवीगाळ बद्दल त्यांनी आता दिलगिरी व्यक्त केली आहे. मात्र, छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख नेहमी सन्मानपूर्वकच व्हावा, ही आपली ठाम भूमिका असल्याचेही संजय गायकवाड यांनी स्पष्ट केले आहे.

**शिवीगाळ बद्दल दिलगिरी**

शिवाजी कोण होता, या पुस्तकातील एकेरी उल्लेखांवर आक्षेप घेत त्यांनी हा विषय वादाचा नसून संस्कार आणि आदराचा असल्याचे मत व्यक्त केले. अलीकडील वादात आपल्या तोंडून काही अयोग्य शब्द गेले असल्याची जाणीव व्यक्त करत मनापासून दिलगिरीही व्यक्त करतो. तसेच, छत्रपती शिवरायांविषयी निष्ठा आणि सन्मान कायम ठेवत संबंधितांनी योग्य ती दुरुस्ती करावी. ज्यांना बुलढाण्यात येऊन हे पुस्तक वाचायचे आहे, त्यांनी ते वाचावे. पण, एकेरी उल्लेख न करता छत्रपती शिवाजी महाराज असाच उल्लेख करावा. महाराजांचा अपमान करुन करोडो हिंदूंचा अपमान करू नये, अशी अपेक्षा सुद्धा त्यांनी व्यक्त केली.

# विजय काँग्रेसचा, आक्रोश भाजपाचा

**महिला आरक्षणाशी संलग्न असेलेले मतदारसंघ फेररचना विधेयक (१३१ वे सुधारणा विधेयक २०२६) हे लोकसभेत नामंजूर झाले आणि भाजपा विरूध्द काँग्रेस अशा नव्या राजकीय संघर्षाला सुरूवात झाली. महिला आरक्षणाच्या पदराआडून सरकारने आणलेले मतदारसंघ फेररचना विधेयक फेटाळले गेले , असे काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, सपा आदी इंडिया ब्लॉकमधील पक्ष सांगत आहेत तर काँग्रेससह विरोधकांनी महिला आरक्षणाची भृणहत्या केली असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केला आहे.**

मोदी- शहांची री ओढतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही शरद पवार आणि उद्धव ठाकरेंचे नाव घेऊन त्यांचे वाभाडे काढले. त्यांनी आपल्या महिला विरोधी मानसिकतेचे दर्शन घडवले. ७० कोटी महिलांचा विश्वासघात करीत विरोधकांनी या विधेयकाची भृणहत्या केली. त्याहीपेक्षा वाईट म्हणजे भृणहत्या केल्यावर त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. तो एकप्रकारे भारतातील समाजसुधारकांच्या विचारांवर त्यांनी केलेले तांडव होते या विधेयकाच्या समर्थनार्थ महाराष्ट्रातील एक कोटी महिलांच्या स्वाक्षऱ्या गोळा केल्या जातील, असेही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले.

संविधान सुधारणा विधेयकाच्या मंजुरीसाठी दोन तृतियांश बहुमत हवे, हे सरकार आणि विरोधी पक्षाला पूर्ण ठाऊक होते. एनडीए सरकारकडे दोन तृतियाश एवढे संख्याबळ नाही, याची जाणीव पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संसदीय कामकाज मंत्री किरण रिजीज्जू, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह किंवा जे. पी.नड्डा यांना नव्हती असे कसे म्हणता येईल. पण आपण काहीही करू शकतो, असे श्रेष्ठींना वाटले असावे. संसदेत व विधिमंडळात महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे विधेयक यापुर्वी २०२३ मधे ४५४ विरूध्द २ अशा विक्रमी बहुमताने मंजुर झाले होते. पाच दिवसांच्या विशेष अधिवेशनात काँग्रेस, सपा, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, राष्ट्रवादी काँग्रेस, उबाठा सेना सर्व विरोधी पक्षांनी महिला आरक्षणाला होकार दर्शवला होता. त्यावेळी भाजपाच्या अनेक मुख्यमंत्र्यांनी ऐतिहासिक विजय असे वर्णन करून महिला आरक्षणाचे सर्व श्रेय मोदींना दिले होते. जे काँग्रेसला सत्तर वर्षात जमले नाही, ते मोदींनी करून दाखवले अशी स्तुतीसुमने भाजपाची सत्ता असलेल्या राज्यातून उधळली गेली. मोदींची प्रशंसा करणाऱ्या ट्वीट चा वर्षाव भाजपाच्या नेत्यांकडून झाला होता. मग आज हे सर्व ट्वीट बहाद्दर काँग्रेसने पाप केले, काँग्रेसने गुन्हा केला, महिलांचा अपमान केला, महिला काँग्रेसला व विरोधकांना कधीच माफ करणार नाहीत, अशा धमक्या का देत आहेत ?

गेल्या बारा वर्षात भाजपाने अनेक राज्यात विरोधी पक्षांच्या दिग्गजांना पायघड्या घातल्या. प्रादेशिक पक्षांची तोडफोड करून त्यांना दुर्बल केले. केंद्रीय तपास यंत्रणांच्या नोटीसा देऊन विरोधी नेत्यांना हतबल केले. प्रत्येक निवडणुकीत इव्हीएम घोटाळ्याचे आरोप झाले. आता एसआयआरच्या नावाखाली राज्याराज्यात लाखो मतदारांची नावे वगळली गेली. प्रशासन, निवडणूक आयोग, पोलीस व सुरक्षा दले अशी सर्व बलाढ्य यंत्रणा सरकारकडे आहेत. तरीही लोकसभेत १३१ व्या संविधान सुधारणा विधेयकावर सरकारचा पराभव कसा झाला? मोदी सरकारने आणि सत्ताधारी भाजपाने विरोधी पक्षाला विश्वासात घेतले नव्हते, विरोधकांशी सल्लामसलत करून तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावले नव्हते. विरोधी पक्षही यावेळी सावध होता. त्यांनी एकजूट राखली. स्वत: राहुल गांधी द्रमुक, तृणमल काँग्रेस आदी पक्ष प्रमुखांच्या संपर्कात होते. विरोधकांच्या ऐक्यामुळे सरकारवर नामुष्की आली. महिला आरक्षणाला जोडून मतदारसंघ फेररचनेचे विधेयक आणण्याची चलाखी फसली. पश्चिम बंगाल व तामिळनाडू राज्यात निवडणुका आहेत, तिथे द्रमुक व तृणमूल काँग्रेसचे



खासदार जास्त आहेत. विशेष अधिवेशनासाठी त्यांना दिल्लीला यावे लागेल व त्यांच्या राज्यात

**डॉ.सुकृत खांडेकर**

प्रचाराला वेळ देता येणार नाही, असाही त्यामागे राजकीय हेतू असू शकतो. गेल्या बारा वर्षात सरकारने संसदेत आणलेल्या विधेयकावर पराभव झाला असे प्रथमच घडले. सरकारला फाजिल आत्मविश्वास नडला की विरोधकांना मनेज करणे जमले नाही ? तरीही वायएआर काँग्रेस पक्षाची पाच मते फोडण्यात यश मिळाले पण ते पुरेसे ठरले नाही.

तीन वर्षापूर्वी महिलांना ३३ टक्के जागा आरक्षित ठेवणारे विधेयक मंजूर झाले असताना सरकारने पुन्हा का आणावे ? मंजूर झालेल्या विधेयकाची अधिसुचना काढायलाही सरकार विसरले होते. काँग्रेसच्या वेणुगोपाल व तिवारींनी अधिसुचना निघालेलीच नाही मग सरकार कोणत्या कायद्यात सुधारणा करणार असा प्रश्न विचारला तेव्हा सरकारला जाग आली व सोळा एप्रिल रोजी मध्यरात्री अधिसुचना जारी करण्यात आली. हे सर्व सरकारला हास्यास्पद होते. तीन वर्षापूर्वी महिला आरक्षण विधेयक संसदेने मंजूर केले मग ते का लागू झाले नाही, याचे स्पष्टीकरण सरकारे कधीच दिले नाही. तीन वर्षापूर्वी महिला रक्षणासाठी पाच दिवसांचे विशेष अधिवेशन झाले आता तीन दिवसांचे झाले. त्यावर कोट्यवधी खर्च झाला. निष्पन्न काय झाले ?

महिला आरक्षण विधेयकावर दोन दिवस झालेल्या चर्चेत १३० सदस्यांनी भाग घेतला. महिला खासदारांनी भाषणे केली. अमित शहा यांनी चर्चे ला उत्तर दिले. विधेयक मंजूर होणार नाही याची त्यांना कल्पना असावी. विरोधकांची मानसिकता ना महिला हिताची, ना देशहिताची, महिला आरक्षणाच्या मार्गात काँग्रेस अडथळा निर्माण करीत आहे, विरोधकांना त्याची किमत मोजावी लागेल, असाही इशारा त्यांनी दिला. महिला विधेयकावर सरकारचा पराभव झाल्यानंतर भाजपाने काँग्रेसला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. जसे लाडकी बहिण योजना राबवून राज्याराज्यात भाजपाने आपली व्होट बँक निर्माण केली आहे तसेच काँग्रेससह विरोधी पक्ष हे महिला आरक्षणाच्या विरोधात आहेत असा प्रचार करून महिलांची आपल्या पक्षाला सहानभुती मिळविण्याची जोरदार मोहीम भाजपाने सुरू केली आहे.

महिला आरक्षण संलग्न मतदारसंघ फेररचना विधेयक लोकसभेत नामंजूर झाल्याचे जाहीर झाले तेव्हा सात वाजून ४५ मिनिटे झाली होती, रात्री आठ वाजता, काँग्रेसच्या नावाने निषेधाच्या घोषणा देत हातात पोस्टर्स बनर्स फडकवित भाजपाच्या महिला खासदार संतप्त होऊन संसद भवनातून बाहेर पडल्या. केवळ १५ मिनिटात त्यांच्या हाती पोस्टर्स किंवा बनर्स कुठून आले हे गूढच आहे. विधयेक नामंजूर झाले की काँग्रेसच्या नावाने शंख करीत घोषणा द्यावयच्या हे कथानक अगोदर ठरलेले असावे अशी उघड चर्चा झाली.

भाजपा व एनडीएमधील घटक पक्ष महिला सशक्तिकरणाची भाषा बोलत आहेत. आम्हीच महिलांचे कैवारी व काँग्रेस पक्ष महिला विरोधी असे सांगत आहेत. पण महाराष्ट्रात भोंदूबाबा अशोक खरातने असंख्य महिलांचे लैंगिक शोषण व फसवणूक केल्याचे उघडकीस आले तेव्हा ही सशक्तिकरण लॉबी कुठे रस्त्यावर दिसली नाही. उन्नावमधे अठरा वर्षाच्या बलात्कारीत मुलींचे अख्ख कुटुंब मारलं गेल, तिचा अतोनात छळ केला गेला होता, कठुआमधे अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिला कोंडून ठेवले गेले, बलात्कारीत आरोपीला सोडावे म्हणून मोर्चा निघाला होता, विनेश फोगट, साक्षी मलिक, बजरंग पुनिया या आंतरराष्ट्रीय सन्मान पदके मिळविणाऱ्या कुस्तीपटुंनी दिल्लीत जंतरमंतर येथे लैंगिक शोषणाविरोधात आंदोलन केले होते, मणिपूरमधे महिलांची अर्धनग्न मिरवणूक काढली होती अशी अनेक उदाहरणे आहेत. तेव्हा महिला सशक्तिकरणाची पोस्टर्स बनर्स कुठे होती?






**नाशिक परिवहन कार्यालयात शांतता नित्य गजबजणारे प्रादेशिक परिवहन कार्यालय ४० कर्मचाऱ्यांनी बेमुदत बंदच्या संपात भाग घेतल्यामुळे बुधवारी (२२) कार्याची कामकाज पूर्णपणे ठप्प झाले होते यामुळे परवाना वाहन नोंदणी आणि कर भरण्यासाठी आलेल्या नागरिकांना मोठा फटका बसला बाहेरच थांबून कार्यालयात शुकशुकाट पाहून सर्व नाराजीने निघून गेले. इतर सरकारी कार्यालयांमध्येही संपामुळे शुकशुकाट पसरलेला होता.**




# भारत विकास परिषदेचा दायित्व ग्रहण सोहळा उत्साहात

**धुळे दि.२४- राष्ट्रीय स्तरावरील सेवाभावी संस्था म्हणून कार्यरत असलेल्या भारत विकास परिषदेच्या धुळे शाखेच्या २०२६-२७ साठी नूतन पदाधिकाऱ्यांचा दायित्व ग्रहण सोहळा नुकताच दाते रिजेन्सी येथे उत्साहात संपन्न झाला. प्राचार्य विजयसिंह सिसोदीया यांनी अध्यक्ष पदाचे दायित्व ग्रहण केले तर विनित जी जैन यांनी सचिव पदाचे व राजू बडगुजर यांनी कोशाध्यक्ष पदाचे दायित्व ग्रहण केले.**

मावळते अध्यक्ष राजेश वाणी व मावळते सचिव अजय कासोदेकर यांनी नूतन अध्यक्ष सचिव कोशाध्यक्ष यांना दायित्व सोपवले. सोबतच नवीन कार्यकारी मंडळानेही दायित्व ग्रहण केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व भारत विकास परिषदेचे महाराष्ट्र उत्तर प्रांत अध्यक्ष विशाल चोरडिया यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना आपापल्या पदाच्या दायित्वाची शपथ दिली. याप्रसंगी रा स्व संघाचे बौध्दिक विभाग प्रमुख प्रा.डॉ .दत्तात्रय चौधरी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय गतिविधी संस्कार सदस्य अभय चोकसी व महाराष्ट्र उत्तर प्रांत महासचिव राजेंद्र जाखडी मान्यवर अतिथी म्हणून उपस्थित होते. राजेश वाणी यांनी प्रास्ताविकातून दोन वर्षांतील विविध उपक्रमांचा आढावा घेतला व त्यासाठी सहकार्य केलेल्या सभासदांचा सन्मान केला. अजय कासोदेकर यांनी सचिवांचा अहवाल सादर केला. नूतन अध्यक्ष प्राचार्य सिसोदीया यांनी येत्या वर्षभरात नवनवीन सामाजिक उपक्रम सर्वांना सोबत घेऊन राबविण्याचा संकल्प जाहीर केला. सौ.वृशाली येवले व सौ सायली विरगावकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.डॉ.भूपेंद्र मालपुरे यांनी आभार मानले.

प्रा.चौधरी यांनी भारत विकास परिषदेच्या सेवाभावी कार्याची प्रशंसा केली व नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले तसेच शाखा विस्तार वाढवून कार्य आणखीन जोमाने करण्याचा सल्ला दिला. चोरडिया यांनी भारत विकास परिषदेचे कार्य प्रशंसनीय असून सभासद वृध्दीकडे भर द्यावा असे प्रतिपादन केले. याप्रसंगी राजकीय सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# राष्ट्रीय महिला आयोग आपल्या दारी उपक्रमांतर्गत २८ प्रकरणांवर सुनावणी

**नवी मुंबई, दि.२४- महिलांच्या तक्रारींचे त्वरित निवारण करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत महिलांचा कायदा व प्रशासनावर विश्वास वाढविणे, ही महत्वाची बाब असून अशा उपक्रमांमुळे महिलांना न्याय मिळण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी व्यक्त केला.**



श्रीमती विजया रहाटकर यांच्या अध्यक्षतेखाली महिला जनसुनावणी आयोजित करण्यात आली. या जनसुनावणीत विविध प्रकारच्या एकूण २८ प्रकरणांवर सुनावणी पूर्ण झाली. तर उर्वरित प्रकरणांवर येत्या आठ दिवसात निराकरण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी संबंधिताना दिल्या. राष्ट्रीय महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत महिला जनसुनावणी नवी मुंबई बेलापूर येथील सिडको भवन येथे जनसुनावणी घेण्यात आली. यावेळी राष्ट्रीय महिला आयोग अतिरिक्त सचिव राधिका चक्रवर्ती, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, नवी मुंबई पोलीस आयुक्त श्री. मिलिंद भारंबे, विधी प्राधिकरण अधिकारी, संबंधित विविध विभागांचे अधिकारी आणि संबंधित तक्रारदार महिला उपस्थित होत्या.

या जनसुनावणीसाठी ६३ अर्ज आयोगाला प्राप्त झाले होते. राष्ट्रीय महिला आयोगाकडे नोंदणीकृत तक्रारी २८, वॉक इन मध्ये आलेल्या नवीन ३५ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यातील २८ तक्रारांची सुनावणी पूर्ण झाली असून उर्वरित ३५ तक्रारांची सुनावणी येत्या ८ दिवसात निराकरण करण्यासाठी प्रयतक करण्यात येतील. तर काही प्रकरणे न्यायालयीन प्रक्रीयेत असल्यामुळे त्यांना थोडा वेळ लागू शकतो. मात्र बहुतांश तक्रारींमध्ये सकारात्मक परिणाम दिसून येईल, असा विश्वास आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रहाटकर यांनी व्यक्त केला.

या जनसुनावणीदरम्यान महिलांविरुद्धच्या विविध स्वरूपाच्या तक्रारींचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. यामध्ये बलातकार/बलातकाराचा प्रयतक-१ प्रकरण, लैंगिक छळ-५ प्रकरणे, मारहाण-३ प्रकरणे, घरगुती हिंसाचार-१४ प्रकरणे, हुंडाबळी छळ-३ प्रकरणे, सायबर गुन्हे-१ प्रकरण आणि अपहरण-१ प्रकरण अशा विविध २८ तक्रारींवर प्रत्यक्ष कार्यवाही पूर्ण करुन सुनावणी घेण्यात आली.

दरम्यान, प्रसिद्ध झालेल्या बातम्यांमुळे आणि प्रशासनाच्या आवाहनामुळे अजून महिलांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून आपल्या तक्रार नोंदवल्या असून, त्या प्रकरणांची सुनावणीही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. या उर्वरित प्रकरणांमध्येही काही ट्रॉसिटी तसेच घरगुती हिंसाचाराच्या तक्रारी आहेत. विशेषतः ते घरगुती हिंसाचाराच्या प्रकरणांमध्ये समुपदेशन व मध्यस्थीच्या माध्यमातून कुटुंबातील वाद मिटविण्याचा प्रयतक केला जात आहे. ठाणे, नवी मुंबई तसेच राज्य महिला आयोगाचे समुपदेशक आणि प्रोटेक्शन अधिकारी उपस्थित राहून कुटुंबांमधील वाद मिटविण्यासाठी समुपदेशन व मध्यस्थी प्रक्रिया राबवित असल्याचे त्यांनी नमूद केले.

# अतिउष्णतेच्या संकटाचा सामना करण्यासाठी सक्षम उपाययोजना

मुंबई, दि.२४- हवामान बदल या संकटाचा सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला, विशेषतः अल्प भूधारक शेतकऱ्यांना बसत आहे अतिउष्णतेच्या संकटावर उपाययोजना करण्यासाठी तसेच उष्णता प्रतिसादक्षम व शाश्वत शीतकरणासाठी सेंटर फॉर एक्सलेन्सचा शुभारंभ करण्यात आला असून हे केंद्र भविष्यात राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेचा भाग म्हणून कार्यरत होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे आयआयएम, नागपूर येथील सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर हिट रेसिलियन्स अँड सस्टेनेबल कुलिंगचे उदघाटन केले. यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिलचे अध्यक्ष मनीष बापना, एनआरडीसी इंडियाच्या कंट्री डायरेक्टर दीपा सिंग बगई, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉक्टर भालचंद्र चव्हाण, नागपूर इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंटचे संचालक डॉ. भिमराया मैत्री उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,विदर्भासह राज्याच्या अनेक भागांत अलीकडे उष्णतेच्या लाटेमुळे शाळा-महाविद्यालये बंद ठेवण्याची वेळ आली होती. हवामान बदल या संकटाचा सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला, विशेषतः छोट्या शेतकऱ्यांना बसत आहे. दुष्काळ, गारपीट आणि वाढते तापमान यामुळे समस्याही गंभीर होत आहेत, यावर तोडगा काढण्यासाठी सेंटर फॉर एक्सलन्स उपयुक्त ठरणार आहे. या संस्थेमार्फत सुरुवातीला प्राधान्याने उष्णलाट कृती आराखडा आणि शहरी हवामान कृती आराखड्यांचा आढावा घेऊन प्राधान्य दिलेल्या शहरांना आणि जिल्ह्यांना तांत्रिक अंमलबजावणीसाठी सहाय्य केले जाईल. उष्णलाट कृती आराखड्यासाठी सक्षम योजना तयार करणे, वार्षिक अंमलबजावणीवर भर देणे. त्यासाठी अधिकारी, आरोग्य कर्मचारी, स्थानिक शहरी नागरिकांसाठी प्रशिक्षण आराखडा तयार करण्यात येणार आहे.




# पश्चिम बंगालमध्ये ९२ टक्के मतदान लोकशाही बळकट : न्या. सुर्यकांत

**नवी दिल्ली, दि.२४- देशाचे लक्ष लागलेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारांचा उत्साह शिगेला पोहोचल्याचे पाहायला मिळाले. पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यात आज उच्चांकी ९२ टक्के तर तामिळनाडूत ८५.०५ टक्के मतदान झाले. त्या पार्श्वभूमीवर भाजप आणि तृणमृल काँग्रेसने विजयाचा दावा केला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, महासत्ता परिवर्तनाचा हा संकेत आहे. ममता बॅनर्जी यांनी देखील तृणमूल काँग्रेसच सत्तेत येईल, असा दावा केला. गुरुवारी विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात २९४ पैकी १६ जिल्ह्यांतील १५२ जागांसाठी मतदान झाले. त्यामध्ये प्रथमच विक्रमी ९२ टक्के मतदान झाले आहे. मतदानाची वाढलेली आकडेवारी पाहून सर्वचस्तरातून कौतुक होत आहे. विशेष म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाने देखील मतदानाची आकडेवारी पाहून आनंद व्यक्त केला आहे.**

पश्चिम बंगालच्या पहिल्या टप्प्यात ९२ टक्क्यांहून अधिक मतदान झाल्याबद्दल सुप्रीम कोर्टाने आनंद व्यक्त केला. भारताचा नागरिक म्हणून, मतदानाची ही टक्केवारी पाहून आपल्याला अत्यंत आनंद झाल्याचे मत मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी व्यक्त केले. जेव्हा लोक मतदानाचा हक्क बजावतात, तेव्हा लोकशाही बळकट होते आणि जेव्हा नागरिक आपल्या मतदानाच्या अधिकाराचे महत्त्व ओळखू लागतात तेव्हा ते हिंसाचारापासून दूर राहतात, असे सरन्यायाधीशांनी म्हटले आहे.

**ऐतिहासिक बाब - बागची**

देशातील पाच राज्यात सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेत हिंसाचाराच्या कोणत्याही मोठ्या घटना घडल्या नाहीत, असे निरीक्षण न्यायमूर्ती बागची यांनी नोंदवले. तर ९२ टक्के मतदान होणे ही एक ऐतिहासिक बाब असल्याच निरीक्षण सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी नोंदविले. पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यात ९२ टक्क्यांहून अधिक मतदान झाले, तर तामिळनाडूमध्येही २३४ जागांसाठी ८५.०५ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावत विक्रम प्रस्थापित केला. प. बंगालमध्ये दुसऱ्या टप्प्यात २९ एप्रिलला १४३ जागांसाठी मतदान होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प. बंगालच्या मतदारांनी उत्स्फूर्तपणे केलेल्या मतदानाबद्दल अभिनंदन करीत हे राज्यातील सत्ता परिवर्तनाचे संकेत असल्याचे म्हटले आहे.



# नंदुरबार जिल्ह्यात ८९ रुग्णांना सुमारे ८४ लाखांची मदत
## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

**नंदुरबार, दि.२४ (प्रतिनिधी)- शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी आधार ठरत आहे. नंदुरबार जिल्ह्यात आर्थिक वर्षात ८९ रुग्णांना सुमारे ८४ लाख ५० हजार रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे. मुख्यमंत्री सहायता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरित्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**२० गंभीर आजारासाठी मदत**

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी/ रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

**सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

**आर्थिक वर्षातील मदत**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत नंदुरबार जिल्ह्यातील ८९ रुग्णांना सुमारे ८४ लाख ५० हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. नंदुरबार जिल्ह्यातील ८९ रुग्णांना सुमारे ८४ लाखांहून अधिक मदत मिळाल्याने मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीची प्रभावी अंमलबजावणी दिसून येते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून सुरू झालेली पेपरलेस व नवीन कार्यपद्धती, तसेच समाजाच्या सहभागामुळे गरजू रुग्णांना वेळेत उपचारासाठी आर्थिक आधार मिळत आहे. ही मदत अनेक कुटुंबांसाठी जीवनदायी ठरत आहे. गरजू रूग्णांनी अधिक माहितीसाठी व सहाय्यासाठी या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये दोन वर्षांत २१ हजार रुग्णांवर मेंदू आणि मणकेविकार उपचार; सरकारी योजनांचा लाभ

**नाशिक, दि.२४- मेंदू आणि मणक्याचे विकार हे अत्यंत गंभीर आणि खर्चिक मानले जातात. मात्र, उत्तर महाराष्ट्रातील गोरगरीब रुग्णांना या व्याधींतून मुक्त करण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील एसएमबीटी हॉस्पिटल एक आशेचा किरण ठरले आहे. गेल्या दोन वर्षांत या विभागाने डॉ. हितेंद्र गडकरी यांच्या नेतृत्वाखाली २१ हजारांहून अधिक रुग्णांची मोफत तपासणी व सल्ला मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे, या कालावधीत ७०० पेक्षा अधिक यशस्वी शस्त्रक्रिया पार पडल्या. या सर्वच शस्त्रक्रिया या अतिशय क्लिष्ट आणि गुंतागुंतीच्या स्वरूपाच्या यशस्वी करण्यात आल्याचे डॉ हितेंद्र गडकरी यांनी सांगितले.**

प्रख्यात मेंदू आणि मणकेविकार तज्ज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी यांनी केवळ समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना परवडेल अशा दरात आरोग्यसेवा मिळावी, या उदात्त हेतूने दोन वर्षांपूर्वी एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये पदभार स्वीकारला. डॉ. गडकरी यांना मेंदू आणि मणकेविकार शस्त्रक्रियांचा वर्षांपेक्षा अधिक दांडगा अनुभव आहे. नाशिक, पुणे, मुंबई, जळगाव आणि गुजरातमध्ये त्यांनी सेवा बजावली असून, काही वर्षे त्यांनी परदेशातही आपल्या कौशल्याचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या या प्रदीर्घ अनुभवाचा फायदा आज दुर्गम भागातील रुग्णांना मिळत आहे.

एसएमबीटी येथील उपचार पद्धतीवर विश्वास ठेवून केवळ उत्तर महाराष्ट्रातूनच नव्हे, तर भिवंडी, शहापूर, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, जुन्नर आणि पुणे परिसरातील तज्ज्ञ डॉक्टरांनी आपले रुग्ण याठिकाणी रेफर केले आहेत. अत्यंत गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडत असल्याने वैद्यकीय क्षेत्रात या केंद्राबद्दल मोठी विश्वासार्हता निर्माण झाली आहे. मेंदू आणि मणक्याच्या शस्त्रक्रियांचा खर्च लाखांच्या घरात असतो. मात्र, एसएमबीटीमध्ये हे उपचार शासकीय योजनांमध्ये समाविष्ट असल्याने रुग्णांना कोणताही आर्थिक भार सोसावा लागत नाही. पैशाअभावी कोणाचेही उपचार थांबू नयेत, हे रुग्णसेवेचे ब्रीद याठिकाणी प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे.

एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये डॉ. गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत क्लिष्ट आणि आव्हानात्मक शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या जात आहेत. यामध्ये प्रामुख्याने मेंदूतील गाठी काढणे, मेंदूतील रक्तवाहिनी फुगल्यास केली जाणारी ॲन्युरिझम क्लिपिंग, मणक्यातील गादी सरकल्याने नसांवर येणारा दाब काढण्याची मायक्रो-डिसेक्टोमी आणि पाठीच्या कण्याला आधार देणारी स्पाइनल फिक्सेशन यांसारख्या अवघड शस्त्रक्रियांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, या सर्व महागड्या शस्त्रक्रिया आयुष्मान भारत योजनेअंतर्गत समाविष्ट असल्याने रुग्णांना त्या मोफत उपलब्ध होत आहेत. अपघातामुळे डोक्याला झालेली गंभीर दुखापत असो किंवा मणक्याचे फ्रॅक्चर, शासकीय योजनेच्या आधारामुळे गरीब व मध्यमवर्गीय रुग्णांना लाखांचा आर्थिक भार सोसावा न लागता जागतिक दर्जाचे उपचार मिळत आहेत. यामुळेच गुंतागुंतीच्या आजारांसाठी हे रुग्णालय आता उत्तर महाराष्ट्रातील एक हक्काचे केंद्र बनले आहे.शस्त्रक्रिया यशस्वी होण्यासाठी केवळ तज्ज्ञ डॉक्टर असून चालत नाही, तर तिथली व्यवस्थाही तितकीच महत्त्वाची असते. एसएमबीटीमध्ये पेक्षा अधिक आयसीयू बेड्स, अत्याधुनिक मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्स आणि मेंदू व मणक्याच्या रुग्णांसाठी स्वतंत्र सुसज्ज अतिदक्षता विभाग उपलब्ध आहेत. या रुग्णांची काळजी घेण्यासाठी विशेष प्रशिक्षित सपोर्टिंग आणि नर्सिंग स्टाफ उपलब्ध आहे, ज्यामुळे आजार बरे होण्याचे प्रमाण अधिक असून रुग्ण लवकर डिस्चार्ज घेऊन घरी परतत आहेत.



# शिरपूर एज्युकेशन सोसायटीतर्फे तीन दिवसीय कार्यशाळा संपन्न; शिक्षकांना मिळाली नवी ऊर्जा

**शिरपूर- शिरपूर एज्युकेशन सोसायटी आणि मनशक्ती प्रयोगकेंद्र, लोणावळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली तीन दिवसीय शिक्षक कार्यशाळा नुकतीच उत्साहात संपन्न झाली. शिक्षकांचे मानसिक आरोग्य, विद्यार्थ्यांचे वर्तन आणि अध्यापनातील मानसशास्त्रीय दृष्टिकोन या विषयांवर या कार्यशाळेत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.**

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अॅकॅडमीक इन्चार्ज पी. व्ही. पाटील यांनी कार्यशाळेमागची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, शिक्षकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना मानसिक बळ देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.संस्थेचे सीईओ डॉ. उमेश शर्मा अध्यक्षीय भाषणात म्हणाले, शिरपूर एज्युकेशन सोसायटी नेहमीच शिक्षकांच्या गुणवत्तेसाठी कटिबद्ध आहे. मनशक्ती केंद्राच्या या उपक्रमामुळे शिक्षकांना केवळ व्यावसायिकच नव्हे, तर वैयक्तिक आयुष्यातही मोठी मदत होणार आहे, असे स्पष्ट केले.

संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनातून सातत्याने होत असते. संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपालजी भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल यांनी कार्यशाळेसाठी शुभेच्छा दिल्या.कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी मनशक्ती केंद्राचे प्रवक्ते अजित फापाळे यांनी मुलांच्या वर्तन विषयक समस्या: कारणे आणि उपाय या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ श्रीमती दीपा राक्षे यांनी रॅशनल इमोटिव्ह बिहेविअरल थेरपी () या विषयावर तांत्रिक आणि प्रायोगिक सत्र घेतले. कार्यशाळेच्या समारोप सत्रात मनशक्ती केंद्राचे प्रवक्ते सोपानराव शिंदे यांनी शिक्षकांनी आपल्या व कुटुंबाच्या स्वास्थासाठी करावयाचे उपाय या विषयावर मार्गदर्शन केले. या तीन दिवसांच्या शिबिरात संस्थेच्या विविध शाळांमधील शिक्षक सहभागी झाले होते. तणावमुक्त अध्यापन आणि आनंदी जीवन जगण्याची नवी दृष्टी मिळाल्याची भावना सहभागी शिक्षकांनी व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य पी. आर. साळुंखे, प्राचार्य एस जे पाटील यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राकेश रघुवंशी व आभार दिपक चौधरी यांनी मानले.



# विविध मागण्यांप्रश्नी शिक्षक संघटनांचे निवेदन

**धुळे, दि.२४- धुळे जिल्हा मुख्याध्यापक संघ, धुळे जिल्हा टीडीएफ, ज्यू कॉलेज संघटना, माध्यमिक शिक्षक संघ,शिक्षक भारती, शिक्षकेतर कर्मचारी संघटना ,कायम विना अनुदानित शाळा कृती समिती, स्वाभिमानी शिक्षक संघटना यासह जिल्ह्यातील सर्व संघटना व प्रतिनिधी व यांच्यासह शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयात उपशिक्षणाधिकारी प्रमोद पाटील, वेतन अधीक्षक रामकृष्ण लोहार यांना निवेदन देऊन लवकर कॅम्प लावण्याबाबत मागणी करण्यात आली.**

यावेळी धुळे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष आर व्ही पाटील, नाशिक विभाग टी डी एफ चे अध्यक्ष संजय पवार, ज्युनिअर कॉलेज संघटनेचे जिल्हाध्यक्ष सतिष पाटील, माध्यमिक शिक्षक संघाचे राजेंद्र भदाणे, शिक्षक भारती संघटनेचे आबासाहेब पाटील, शिक्षकेतर कर्मचारी संघाचे देवानंद ठाकूर, मुख्याध्यापक संघाचे मार्गदर्शक एस बी सुर्यवंशी, सचिव उदय डी तोरवणे, उपाध्यक्ष सतिष देवरे, उपाध्यक्ष के व्ही बाविस्कर, धुळे शहराध्यक्ष संजीव पाटील, शिंदखेडा तालुकाध्यक्ष एस ए कदम, धुळे तालुकाध्यक्ष आर जे पाटील, राजेश पाटील आर जे पाटील, प्रविणकुमार लाडे, डी सी महाले, एस एस भलकार, पी एम कदम, एम डी पाटील, सौ एस पी गायकवाड, सौ जे डी बोरसे ,रूपेश कुलकर्णी, आर व्ही शिंदे, व्ही टी गवळे, डी एस पाटील, एम बी मोरे,जयपाल देशमुख, कैलास अमृतकर, सी डी राजपूत, प्रभाकर वाघ, राम पाटील, चेतन भामरे, कानिफनाथ सूर्यवंशी, ए डी कोठावदे, आर टी अहिरे, एस डी पाटील एफ एम जाधव, सी डी साळुंके, व्ही बी साळुंके, रणजित शिंदे, प्रमोद वाघ, पी व्ही शिसोदे , व्ही डी पाटील, सोनूसिंग गिरासे, एस डी पाटील, एफ एम जाधव, सी डी साळुंके, व्ही बी साळुंके, रणजित शिंदे, प्रमोद वाघ, पी व्ही शिसोदे, व्ही डी पाटील, सोनूसिंग गिरासे यांच्यासह समस्या ग्रस्त मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# मुंबईत पोक्सो अंतर्गत सपोर्ट पर्सन नियुक्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई, दि.२४- बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोक्सो) अंतर्गत बाल पीडितांना न्यायप्रक्रियेदरम्यान सहाय्य व संरक्षण देण्यासाठी सपोर्ट पर्सन नियुक्तीसाठी मुंबई शहर जिल्ह्यातील इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत असल्याची माहिती मुंबई शहर जिल्ह्याच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.**

इच्छुक उमेदवारांनी १५ दिवसांच्या आत आपले अर्ज जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, ११७, बी.डी.डी. चाळ, पहिला मजला, वरळी, मुंबई-४०००१८ या पत्त्यावर सादर करावेत. तसेच अर्ज ई-मेलद्वारे . या ईमेलवर पाठविता येतील. अर्जांची छाननी झाल्यानंतर पात्र उमेदवारांना मुलाखतीची तारीख कळविण्यात येणार आहे. सपोर्ट पर्सनसाठी सामाजिक कार्य, समाजशास्त्र, मानसशास्त्र किंवा बालविकास विषयात पदव्युत्तर पदवी किंवा पदवीधर असून किमान तीन वर्षांचा बाल शिक्षण, विकास किंवा संरक्षण क्षेत्रातील अनुभव असणे आवश्यक आहे. संगणक ज्ञान (एमएससीआयटी) किंवा समकक्ष प्रमाणपत्र अपेक्षित आहे. तसेच बालहक्क किंवा बालसंरक्षण क्षेत्रात कार्यरत संस्थांनाही अर्ज करता येणार असून बालगृह किंवा शेल्टर होममधील संबंधित अधिकारीही पात्र ठरू शकतात. निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती तीन वर्षांसाठी करण्यात येणार असून दरवर्षी कामगिरीचा आढावा घेतला जाईल. आवश्यकतेनुसार जिल्हा बाल संरक्षण अधिकारी (डीसीपीओ) यांच्या शिफारशीवर आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेनंतर कालावधी वाढविला जाऊ शकतो. वेतन कायद्यानुसार वेतन अदा करण्यात येईल.

# एच.आर.पटेल फार्मसी महाविद्यालयातील गेट व जीपॅट परीक्षेत यशस्वी ८५ हून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**शिरपूर, दि.२४- येथील एच. आर. पटेल महाविद्यालयात उत्तुंग भरारी या विद्यार्थी गौरव समारंभाचे उत्साहात आयोजन करण्यात आले.**

या कार्यक्रमात शैक्षणिक, क्रीडा तसेच विविध सहशैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अमेरिकेतील डक क्रीक टेक्नॉलॉजीज या आंतरराष्ट्रीय कंपनीतील मुंबई येथे स्थित व्यवस्थापक व सॉफ्टवेअर अभियंता आणि जाणीव या एन.जी.ओ.चे संस्थापक वरुण देवरे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करताना चिकाटी, कौशल्य विकास व सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व अधोरेखित केले.

समारंभात क्रीडा, शैक्षणिक, संशोधन व विविध स्पर्धात्मक क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ८५ हून अधिक विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. टेबल टेनिस, व्हॉलीबॉल, फेन्सिंग, बेसबॉल, बॉक्सिंग, ज्युडो आदी क्रीडा प्रकारांसह आविष्कार स्पर्धा, आंतरराष्ट्रीय परिषद, आयडिया स्पर्धा आणि संशोधन क्षेत्रातील यशस्वी विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी, विद्यापीठात अव्वल स्थान मिळविणारे विद्यार्थी तसेच राष्ट्रीय स्तरावर विशेष महत्व असलेल्या गेट व जीपॅट परीक्षेत यश संपादन करणाऱ्या हून अधिक विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. एस. बी. बारी, प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. झेड. जी. खान यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाकडून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या अत्याधुनिक प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालय, डिजिटल सुविधा, तसेच प्रशिक्षण व प्लेसमेंटच्या संधींबाबत समाधान व्यक्त केले. या सुविधांमुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस आणि कौशल्य विकासास मदत होते त्याच प्रमाणे तसेच विविध क्रीडा सुविधा, नियमित सरावासाठी उपलब्ध मैदान व क्रीडा साहित्य यांमुळे आम्हाला क्रीडा क्षेत्रातही प्रगती करण्यास उपयोग होत असल्याचेही विद्यार्थ्यांनी नमूद केले.

# कृत्रिम बुद्धिमत्तेला संवेदनशील बनवण्याबाबत चिंतन व्हावे
## विद्यापीठांनी पुढाकार घेण्याची राज्यपाल वर्मा यांची सूचना

**मुंबई, दि.२४- आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग विविध क्षेत्रात मोठी भूमिका बजावणार आहे. त्याचे लाभ जसे अनेक आहेत तसेच त्यातून अनेक समस्या देखील निर्माण होऊ शकतात. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेला अधिक संवेदनशील बनवण्याबाबत चिंतन झाले पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्तेची व्याप्ती वाढवून समाजाच्या शेवटच्या घटकातील लोकांना घेऊन समावेशी विकास झाला पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.**

नाविन्यपूर्ण कौशल्याधारित शिक्षणाला चालना देण्यासाठी मुंबई येथील टलास स्किलटेक युनिव्हर्सिटीने सुरु केलेल्या मसेंटर फॉर इनोव्हेशनफ्चे उदघाटन राज्यपालांच्या हस्ते संस्थेच्या बीकेसी येथील शैक्षणिक संकुलात झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ओ पी जिंदल ग्लोबल युनिव्हर्सिटीने सिरील श्रॉफ सेन्टर ऑफ एआय, लॉ अँड रेग्युलेशनफ यांच्या सहकार्याने आयोजित गव्हर्निंग एआय : कायदा, तंत्रज्ञान व समाज या विषयावरील चर्चासत्राचे देखील उदघाटन राज्यपालांनी केले. तंत्रज्ञान उपलब्ध असणे, परंतु ठोस उद्दिष्ट समोर नसणे; किंवा विज्ञान उपलब्ध असणे, परंतु त्याला मानवी मूल्यांची जोड नसणे धोक्याचे असते, असे सांगून कृत्रिम बुद्धिमत्तेचे नियमन करताना दया, अनुकंपा व सहानुभूतीचा त्यामध्ये अंतर्भाव असला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले. या दृष्टीने शालेय व



महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये दुर्बल घटकांबद्दल अनुकंपा सहानुभूती बाणवली पाहिजे, असे आवाहन राज्यपालांनी केले.

पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी मजय जवानफ या घोषणेला मजय किसानफ्वी घोषणेची जोड दिली होती. त्यानंतर पंतप्रधान वाजपेयी यांनी आपल्या काळात त्याला जय विज्ञानची जोड दिली व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्या घोषणेला मजय अनुसंधानफ्वी जोड दिली असे सांगून सध्याचे युग हे विज्ञान व नवोन्मेषाचे असल्याचे राज्यपालांनी सांगितले. विकसित भारत संज्ञेचा अर्थ आर्थिक दृष्ट्या संपन्न भारत इतका मर्यादित नाही असे सांगून विकसित भारत म्हणजे सर्वे भवन्तु सुखिनः, सर्वे संतु निरामय हा आहे व त्याकरिता प्रत्येक व्यक्तीचा विकास होणे आवश्यक आहे असे राज्यपालांनी सांगितले.

आधुनिकीकरण तसेच मोठ्या प्रमाणावर यंत्रनिर्मित वस्तूंचा वापर वाढल्यामुळे आज जगभरातील हजारो पारंपरिक कला प्रकार आणि हस्तकला नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. एक कला जरी नामशेष झाली तरी आपण आपली सांस्कृतिक ओळख गमावतो. त्यामुळे नामशेष होत असलेल्या कलांचे जतन व संवर्धन झाले पाहिजे व त्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घेतला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.एखादी दुर्मिळ कला वाचवणे म्हणजे तिला संग्रहालयात बंदिस्त करणे असे नसून तिला नवसंजीवनी देणे होय असे राज्यपालांनी सांगितले. या कार्यात टलास कौशल्य विद्यापीठाने देखील पुढाकार घ्यावा असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.राज्यपालांच्या हस्ते यावेळी ओ.पी. जिंदल ग्लोबल विद्यापीठातर्फे प्रकाशित एआय गव्हर्नन्स अहवालाचे प्रकाशन करण्यात आले.

टलासस्किलटेकविद्यापीठाच्या संस्थापिका डॉ इंदू शहानी यांनी प्रास्ताविक केले तर ओ.पी. जिंदल ग्लोबल विद्यापीठाचे कुलगुरु सी राज कुमार यांनी गव्हर्निंग एआय या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राची भूमिका विशद केली. सुरुवातीला राज्यपालांनी विद्यापीठाच्या नाविन्यता केंद्राला भेट दिली व विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांचेकडून नाविन्यपूर्ण उपक्रम व प्रयोगांची माहिती घेतली. कार्यक्रमाला टलास स्किलटेक युनिव्हर्सिटीचे कार्यकारी अध्यक्ष सिद्धार्थ शहानी, कुलगुरु डॉ राजन वेळूकर, सिरील अमरचंद मंगलदास कंपनीचे व्यवस्थापकीय भागीदार सिरील श्रॉफ, अपग्रॅडचे अध्यक्ष रॉनी स्क्रूवाला, विद्यापीठाचे रजिस्ट्रार पराग अमीन, अध्यापक, निमंत्रित व विद्यार्थी उपस्थित होते.

# पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत सायबर सिक्युरिटीवर अच्युतन आनंद यांचे व्याख्यान

**शिरपूर- शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे नुकतेच सायबर सिक्युरिटी या विषयावर विद्यार्थ्यांना संबोधन करण्यासाठी भारतीय नौदलातील निवृत्त अधिकारी तसेच सायबर सुरक्षा आणि क्रिप्टोलॉजी क्षेत्रातील तज्ज्ञ कमांडर अच्युतन आनंद यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.**

यावेळी महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, सर्व विभाग प्रमुख आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आर. सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे नेहमीच विविध सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक, विषयावर उपक्रमांचे विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आयोजन केले जाते. सायबर सिक्युरिटी आजच्या डिजिटल युगात अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. ती आपल्या वैयक्तिक माहितीचे, आर्थिक व्यवहारांचे आणि गोपनीय डेटाचे संरक्षण करते. ऑनलाइन फसवणूक, हॅकिंग आणि डेटा चोरीपासून बचाव करण्यासाठी सायबर सिक्युरिटी आवश्यक आहे. त्यामुळे सुरक्षित आणि विश्वासार्ह डिजिटल वातावरण निर्माण करण्यासाठी सायबर सिक्युरिटी अनिवार्य ठरते. याच अनुषंगाने यावेळी सायबर सिक्युरिटी या विषयावर भारतीय नौदलातील निवृत्त अधिकारी व सायबर सुरक्षा आणि क्रिप्टोलॉजी



क्षेत्रातील तज्ज्ञ, निवृत्त कमांडर अच्युतन आनंद याना आमंत्रित करण्यात आले होते. आनंद यांनी भारतीय नौदलाच्या संशोधन व विकास संस्थांमध्ये तसेच नॅशनल टेक्निकल रिसर्च ऑर्गनायझेशनमध्ये महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सांभाळल्या असून, त्यांनी क्रिप्टोग्राफी आणि माहिती सुरक्षेच्या क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

आनंद यांनी त्यांच्या व्याख्यानात सांगितले की, बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये आवश्यक ते बदल केले पाहिजेत. सायबर गुन्ह्यांपासून डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी मजबूत व वेगवेगळे पासवर्ड वापरणे आवश्यक आहे. कोणत्याही संशयास्पद लिंक, ईमेल किंवा संदेशांवर क्लिक करणे टाळावे. आपली वैयक्तिक व बँकिंग माहिती कुणासोबतही शेअर करू नये आणि नेहमी अधिकृत संकेतस्थळांचा वापर करावा. याशिवाय, अँटीव्हायरस सॉफ्टवेअरचा वापर करणे व नियमितपणे सिस्टम अपडेट ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यांच्या सखोल ज्ञानामुळे आणि अनुभवामुळे हे व्याख्यान अत्यंत माहितीपूर्ण व प्रेरणादायी ठरले. या व्याख्यानामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत अधिक जागरूकता निर्माण झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जे. एस. सोनवणे यांनी केले. सदर व्याख्यानाच्या आयोजनाकरिता विभागप्रमुख डॉ. आर. बी. वाघ, डॉ. यू. एम. पाटील आणि डॉ. डी. आर. पाटील यांचे मोलाचे सहयोग लाभले.



# आर.सी.पटेल संस्थेत एआय क्रिएटर्स बूटकॅम्प, अटल समर कॅम्पचा उत्साहपूर्ण शुभारंभ

**शिरपूर- आर. सी. पटेल व एच. आर. पटेल माध्यमिक विद्यालय शिरपूर तसेच एस.व्ही.के.एम. संचलित एनएमआयएमएस शिरपूर आणि स्टेमसेज यांच्या संयुक्त विद्यमाने एआय क्रिएटर्स बूटकॅम्प व अटल समर कॅम्पचे उदघाटन मेन बिल्डिंग ,शिरपूर येथील राजगोपाल भंडारी हॉल येथे संपन्न झाले.**

शिरपूर एज्युकेशन सोसायटी उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संस्थेच्या सचिव सौ. रेषा पटेल, सीईओ डॉ. उमेश शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी अटल समर कॅम्पचे आयोजन पटेल संकुलाच्या शाळांसाठी करण्यात येते. यावर्षी होणाऱ्या दोन्ही कॅम्पचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्मितीची क्षमता वाढावी आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून समाजातील समस्या सोडविण्याची क्षमता प्राप्त व्हावी तसेच विद्यार्थ्यांच्या संशोधक वृत्तीस चालना देणे हा असून भविष्यात स्वतःचे स्टार्टअप देखील ते चालू करू शकतील असा आहे. त्या अनुषंगाने यावर्षी एआय क्रिएटर्स बूटकॅम्प व अटल समर कॅम्पचे उदघाटन शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे संचालक अतुल भंडारी यांच्या हस्ते व डॉ. सुनिता पाटील (संचालक एस.व्ही. के.एम. एनएमआयएमएस शिरपूर कॅम्पस), सीईओ डॉ. उमेश शर्मा, अकॅडमिक इन्चार्ज पी.व्ही. पाटील, डॉ. वेंकटादरी मोरीबॉयना (असोसिएट डीन एस.व्ही. के.एम. एनएमआयएमएस), डॉ. प्रवीणकुमार लोहारकर (विभाग प्रमुख आर्टिफिशियल इंटिजिलन्स एसव्हीकेएम, एनएमआयएमएस शिरपूर), प्राचार्य पी. आर. साळुंखे, प्राचार्य एस.जे.पाटील, पर्यवेक्षक व्ही.बी.चौधरी, पर्यवेक्षक बी.बी.अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

ए.आय. क्रिएटर्स बूटकॅम्प एकूण सहा दिवस व अटल समर कॅम्प एकूण दहा दिवस असे प्रशिक्षण होणार आहे. या दोन्ही प्रशिक्षणात एकूण ३६० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. या दोन्ही कॅम्पचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या क्षेत्राची ओळख करून देणे आणि त्यावर आधारित प्रोजेक्ट्स विकसित करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी मिळणार आहे. आजच्या आधुनिक भारताच्या उभारणीत देशाला आत्मनिर्भर बनवणे हे अत्यंत महत्त्वाचे ध्येय आहे. या पार्श्वभूमीवर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नपूर्तीसाठी हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर यांचे प्रभावी एकत्रीकरण करून नाविन्यपूर्ण संशोधन व नवकल्पना विकसित करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. सुनिता पाटील यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करून प्रोजेक्ट-बेस्ड लर्निंगच्या माध्यमातून नवनवीन कल्पना साकार करण्याचे आवाहन केले. तसेच भविष्यात देशाच्या प्रगतीत सक्रिय योगदान देण्यासाठी विद्यार्थ्यांनी संशोधनात्मक दृष्टिकोन विकसित करावा, असेही त्यांनी यावेळी मार्गदर्शन केले.त्यानंतर डॉ. वेंकटाद्री यांनी विद्यार्थ्यांना मौलिक संदेश देताना, आधुनिक युगात केवळ नोकरी शोधणारे न बनता नोकरी निर्माण करणारे बना, असा प्रेरणादायी सल्ला दिला. त्यांनी उद्योजकतेकडे वळून स्वतः सह इतरांनाही रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे आवाहन केले. सदर कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व संशोधन आवड निर्माण होऊन नवनिर्मितीला चालना मिळणार आहे.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन पी. के. पाटील तर आभार प्रदर्शन बी. एस.महाजन यांनी केले. सदर कार्यक्रमास सर्व शिक्षक बंधू, भगिनी यांचे सहकार्य लाभले.

# जैन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाचा पुढाकार जैन अल्पसंख्याक वि.महामंडळाचे अध्यक्ष गांधींचे प्रतिपादन

**नंदुरबार, दि.२४- जैन समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक उन्नतीसाठी शासन सर्वंकष पावले उचलत असून, समाजातील प्रत्येक घटकापर्यंत योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक उपक्रम राबविले जात आहेत, असे जैन अल्पसंख्याक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत त्यांनी विविध योजनांचा सविस्तर आढावा घेतला.**



बैठकीस प्रभारी जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, जिल्हा पोलीस अधिक्षक श्रवण दत्त, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी, नगरपालिका प्रशासन सह सह आयुक्त जमीर लेंगरेकर, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, अतिरिक्त जिल्हा नियोजन अधिकारी संतोष बोडदे, सर्व नगरपालिका/ नगरपरिषद मुख्याधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (माध्यमिक) तसेच विविध अंमलबजावणी यंत्रणेचे अधिकारी प्रतिनिधी तसेच जैन समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी गांधी यांनी जैन समाजाच्या देशाच्या अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण योगदानाचा उल्लेख करत, व्यापार, उद्योग, शिक्षण व सेवाक्षेत्रात या समाजाची भक्कम भूमिका अधोरेखित केली. देशाच्या सकल देशांतर्गत उत्पन्नात जैन समाजाचा लक्षणीय वाटा असून, महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीतही या समाजाने मोलाची भूमिका बजावली आहे, असे त्यांनी नमूद केले. मात्र, या प्रगत प्रतिमेबरोबरच समाजातील सुमारे ३० टक्के घटक आजही शिक्षण, रोजगार, व्यवसाय व मूलभूत उदरनिर्वाहाच्या गरजांसाठी संघर्ष करत असल्याची वस्तुस्थिती त्यांनी मांडली. सर्वेक्षणातून ही बाब समोर आली असून, ही परिस्थिती अपेक्षेपेक्षा वेगळी व चिंताजनक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यात जैन व पारशी समाज अनेकदा शेवटच्या क्रमांकावर असल्याची बाबही त्यांनी नमूद केली. शैक्षणिक शिष्यवृत्तीमध्ये काही प्रमाणात सहभाग दिसत असला, तरी इतर विकास योजनांचा लाभ समाजापर्यंत पुरेशा प्रमाणात पोहोचत नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. यामागे जागरूकतेचा अभाव, प्रक्रियेची अपुरी माहिती, शासकीय यंत्रणेशी मर्यादित संवाद तसेच या समाजाला गरज नाही असा गैरसमज ही प्रमुख कारणे असल्याचे त्यांनी सांगितले. परिणामी, ज्यांना प्रत्यक्षात मदतीची गरज आहे, त्यांनाही योजनांचा लाभ मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

या पार्श्वभूमीवर समाजात व्यापक जनजागृती, प्रशिक्षण, समुपदेशन आणि प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून योजनांची माहिती पोहोचविणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सन २००७ ते २०२५ या कालावधीत शिक्षण, विशेषतः उच्च शिक्षण व स्पर्धा परीक्षांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयतक करण्यात आले असून, त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रात जैन समाजासाठी स्थापन करण्यात आलेले स्वतंत्र महामंडळ हे या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरले असून, या माध्यमातून आर्थिक सहाय्याबरोबरच धार्मिक अधिकारांचे संरक्षण, विकास योजना व वित्तीय सहाय्य अशा विविध उद्दिष्टांचा समावेश करण्यात आला आहे. या महामंडळासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली असून, विविध योजना अंमलबजावणीच्या अंतिम टप्प्यात आहेत. विशेष म्हणजे, सर्व योजना ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून देण्याचे काम अंतिम टप्प्यात असून, यामुळे लाभार्थ्यांना पारदर्शक, सुलभ व वेगवान सेवा मिळणार आहे. अर्ज प्रक्रिया सुलभ झाल्याने अधिकाधिक नागरिकांना योजनांचा लाभ घेता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महिला बचत गटांची संख्या वाढवून महिलांना उत्पादन, प्रक्रिया व विक्री क्षेत्रात सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विशेष उपक्रम राबविण्याचे निर्देश देण्यात आले. युवकांच्या अर्ज नाकारण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी वैयक्तिक समुपदेशन, मार्गदर्शन व प्रस्ताव तयार करण्यासाठी सहाय्य उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात यावा. जैन समाजाला अल्पसंख्यांक दर्जा मिळून १३ वर्षे झाली असली, तरी अपेक्षित प्रमाणात योजना राबवल्या गेल्या नाहीत, याबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. त्यामुळे आगामी काळात योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

एकूणच, जैन समाजाच्या धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक गरजांचा सर्वंकष विचार करून नंदुरबार जिल्ह्यासाठी स्वतंत्र विकासदृष्टी निर्माण करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण असून. शासन, महामंडळ, जिल्हा प्रशासन व समाजप्रतिनिधी यांच्या समन्वयातून प्रलंबित प्रश्नांना गती देत विकासाच्या नव्या संधी निर्माण करण्याचा विश्वास श्री. गांधी यावेळी व्यक्त केला.




# नाशिक मर्चन्ट बँकेस सर्वोत्कृष्ठ मल्टिस्टेट को ऑप बँक पुरस्कार

**नाशिक, दि.२४ (प्रतिनिधी) - ॲक्मे इन्फोमीडिया आणि नॅफकब यांच्या संयुक्त विद्यमाने आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता दिला जाणारा सर्वोत्कृष्ठ बँक पुरस्कार उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य अशा नामको बँकेस प्राप्त झाला.**

आर्थिक वर्षातील सर्वोत्कृष्ठ मल्टिस्टेट को ऑप बँक, उत्कृष्ठ चेअरपर्सन बँकेचे अध्यक्ष हेमंत धात्रक यांना व सर्वोत्कृष्ठ ट्रेझरी मॅनेजमेंट अशा तीन विविध पुरस्कारने गौरविण्यात आले. सदर पुरस्कार वितरण समारंभ बुधवार दि.२२ एप्रिल रोजी पुणे येथे ॲक्मे इन्फोमीडिया फाऊंडर शुभम गुप्ता, नॅफकबचे योगेश शर्मा यांच्या हस्ते पार पडला. सदर समारंभात पुरस्कार स्वीकारतांना बँकेचे अध्यक्ष हेमंत धात्रक, उपाध्यक्ष प्रकाश दायमा, जनसंपर्क संचालक देवेंद्र पाटील, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी त्रिगुण कुलकर्णी, प्रशासन विभाग प्रमुख योगेश सहाणे, ट्रेझरी विभाग प्रमुख रुपेश चांदवडकर व बोर्ड सेक्रेटरी कल्पेश पारख उपस्थित होते.

# शिंदखेडा शहरात भगवान परशुराम जयंती उत्साहात

**शिंदखेडा, दि.२४ (प्रतिनिधी)- शिंदखेडा शहरात भगवान परशुराम जयंती अतिशय उत्साही वातावरणात संपन्न झाली. अध्यक्षस्थानी शिंदखेडा ब्राह्मण सभेचे अध्यक्ष प्रदीप दीक्षित होते तर प्रमुख वक्ते म्हणून सतीश मुळे चारुशीला दीक्षित श्रीराम बालाजी मंदिर मठाधिपती मेघश्याम बुवा यासह शिंदखेडा ब्राह्मण सभेचे उपाध्यक्ष अनिल जोशी उर्फ गजू यांची विशेष उपस्थिती होती.**



मान्यवरांच्या हस्ते भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाला ब्राह्मण समाजातील स्त्री पुरुष सहकुटुंब सहपरिवार उपस्थित होते. याप्रसंगी सतीश मुळे यांनी भगवान परशुरामाच्या जन्माविषयी कर्तव्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले तर सौ चारुशीला दीक्षित यांनीही परशुरामाचा जन्म परशुरामाने केलेल्या कार्याचा संदर्भ तसेच ऐतिहासिक महत्त्व प्रसंगी उपस्थितितांसमोर मांडले सौ मनीषा नाईक यासह जोशी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रदीप दीक्षित म्हणाले परशुराम हा आज्ञाधारक तसेच जरी संतापी होता तरीही काही क्षणात तो केलेल्या आज्ञेचे पालन करीत होता परशुराम हा विष्णूचा सहावा अवतार मानला जातो शस्त्र चालवणे त्यातील ज्ञान करणे यासंदर्भामध्ये अग्रेसर होते भगवान परशुराम यांनी पुराणकथेमध्ये आपले स्थान प्रस्थापित केलेले आहे भारतीय संस्कृती ही संस्काराने नटलेली संस्कृती आहे प्रत्येक ब्राह्मण कुटुंबातील सदस्यांनी आपल्या घरी भगवान परशुरामांची प्रतिमा लावून त्याचे पूजन करणे महत्त्वाचे आहे. याप्रसंगी श्रीराम बालाजी मंदिर संस्थानचे मठाधिपती मेघशाम महाराज यांनी संत ज्ञानेश्वरांच्या बाबतीत असलेले संस्कार विचार समाजापुढे मांडले. समाजातील प्रत्येक कुटुंबातील मुलांनी ज्या गोष्टी आपल्याला आवश्यक आहेत त्यांचं शिक्षण घेणे गरजेचे आहे असेही भावनिक आवाहन केले. सूत्रसंचालन प्राध्यापक जोशी यांनी केले तर कार्यक्रमाची नियोजन ब्राह्मण सभेचे सचिव विवेक नाईक भरत थेटे चेतन कुलकर्णी यांनी केले भगवान परशुराम जयंतीचा कार्यक्रम अतिशय उत्साहात संपन्न झाला. याबाबत समाजातील उपस्थित त्यांनी समाधान व्यक्त केले शेवटी आभार प्रदर्शन व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# श्री शृंगेरी शंकराचार्य मठात आद्य जगत्गुरु शंकराचार्य जन्मोत्सव भक्तीपूर्ण वातावरणात साजरा

**नाशिक, दि.२४ (प्रतिनिधी)- पंचवटीतील श्रीक्षेत्र काळाराम मंदिराच्या परिसरातील श्री शृंगेरी शंकराचार्य मठात आद्य जगद्गुरु शंकराचार्य जन्मोत्सव मोठ्या भक्तीभावात आणि उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. दिवसभर या ठिकाणी विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**




यावेळी भाजपाचे प्रदेश सरचिटणीस प्रवक्ते लक्ष्मण सावजी, डॉ.संदीप मंडलेचा, तसेच सनातन धर्मातील धर्मपंडित वेद मूर्ती आचार्य आणि अन्य राजकीय आणि सामाजिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती तसेच भावीक दर्शनासाठी उपस्थित होते. सकाळी विविध धार्मिक उपक्रमांनी जन्मोत्सव सोहळ्याला प्रारंभ झाला. नाशिक येथील प्राचीन व सनातन परंपरा असलेल्या या मठामध्ये शंकराचार्यांच्या जन्मोत्सवानिमित्त पारायण करून विश्वकल्याण आणि जगात सर्वत्र शांतता आणि समृद्धी स्थापत्य करण्याच्या उद्देशाने मठाचे अधिकारी व व्यवस्थापक रामगोपाल अय्यर आणि शेखर अय्यर यांच्या हस्ते संकल्प करण्यात आला. तसेच शंकराचार्य यांच्या मूर्तीची विधिवत पूजा करून अभिषेक करण्यात आला. यावेळी महर्षी गौतम गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठान आचार्य वेदमूर्ती रवींद्र पैठणे गुरुजी, वेदमूर्ती शांताराम भानोसे, वेदमूर्ती दिनेश गायधनी आदी पुरोहितांनी रुद्राचे पठण शंकराचार्यांच्या मूर्तीचा अभिषेक , लघुरुद्र पूजा, पंचामृत पूजा आदी विधी केले. तसेच विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी महर्षी महर्षी गौतम गोदावरी वेद विद्या प्रतिष्ठानच्या विद्यार्थ्यांनी मंत्र पठण केले. नाशिक येथील मठात समाधीस्थ झालेल्या दोन्ही शंकराचार्यांच्या पादुकांचे पूजन यावेळेस झाले. दरम्यान, सकाळी ८.३० पासून शांतीसाठी, प्रधान संकल्प, श्री गणेश पूजन, पुण्याहवाचन, लघुरुद्राभिषेक, बिल्वार्चन, आरती झाली व दुपारी महाप्रसाद वितरण करण्यात आले. शृंगेरी शंकराचार्य मठाचे व्यवस्थापक राम गोपाल अय्यर व सहकाऱ्यांनी केले आहे.

# हिवताप दूरीकरणासाठी कटिबद्ध होऊया आज जागतिक हिवताप दिन : डॉ.सोनवणे

**नंदुरबार, दि.२४ (प्रतिनिधी)- पावसाळ्याची चाहूल लागताच कीटकजन्य आजारांचा धोका वाढतो. या पार्श्वभूमीवर, जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २५ एप्रिल हा दिवस जगभरात जागतिक हिवताप दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षी जागतिक आरोग्य संघटनेने हिवताप दुरीकरणासाठी कटिबद्धः आता हे शक्य आहे हे घोषवाक्य दिले असल्याची माहिती जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. रविंद्र सोनवणे यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविली आहे.**

हिवताप (मलेरिया) हा प्लाझमोडियम या परोपजीवी जंतूंमुळे होणारा आणि मादी नाफिलीस डास चावल्यामुळे पसरणारा आजार आहे. याव्यतिरिक्त डेंगी व चिकुनगुण्या यांसारख्या विषाणूजन्य आजारांचा प्रसार एडीस इजिप्ती डासामुळे, तर हत्तीरोगाचा प्रसार क्यूलेक्स डासामुळे होतो. वेळेत उपचार न मिळाल्यास हे आजार प्राणघातक ठरू शकतात. डास प्रामुख्याने मानवी रक्तातील प्रथिनांचा वापर अंडी घालण्याच्या प्रक्रियेसाठी करतात. साठलेले पाणी, उघडी गटारे, टायर, भंगार सामान आणि बांधकामाच्या ठिकाणी साचलेले पाणी ही डासांची उत्पत्तीस्थाने आहेत. डासांच्या विविध सवयींमुळे त्यांच्यावर नियंत्रण मिळवणे आव्हानात्मक असते, त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे हाच सर्वोत्तम मार्ग आहे.

कुठलाही ताप हा हिवताप असू शकतो. त्यामुळे ताप आल्यास तातडीने जवळच्या सरकारी दवाखान्यात जाऊन रक्ताची मोफत तपासणी करून घ्यावी. हिवताप आढळल्यास पूर्ण उपचार घेणे आवश्यक आहे, कारण अर्धवट उपचार घेतलेला रुग्ण पुन्हा आजार पसरवण्यास कारणीभूत ठरू शकतो. आरोग्य विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या सर्व्हेक्षण आणि फवारणी मोहिमेत जनतेने सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. सोनवणे यांनी या प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

# नंदुरबार जिल्ह्यातून विधान परिषदेवर स्थानिक कार्यकर्त्याला संधी द्या

**नंदुरबार (प्रतिनिधी)- नंदुरबार जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी विधान परिषदेवर स्थानिक कार्यकर्त्याला संधी देण्याची एकमुखी मागणी केली आहे. यासाठी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबई येथे जाऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस शिवाजीराव गरजे यांची भेट घेतली.**

या शिष्टमंडळात भरत मानिकराव गावीत, रतन पाडवी, नरेंद्र नगराळे, प्रतिभा शिंदे, वतन अग्रवाल तसेच इतर कार्यकर्त्यांचा समावेश होता. या वेळी डॉ. अभिजित दिलीपराव मोरे यांना विधान परिषदेची उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघ आदिवासी संवर्गासाठी राखीव असल्यामुळे डॉ. मोरे यांना निवडणूक लढविण्याच्या संधी मर्यादित राहतात. तरीही मोरे कुटुंबाचे पक्षासाठी मोठे योगदान असल्याचे कार्यकर्त्यांनी नमूद केले. डॉ.अभिजित मोरे यांनी जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर पक्षाची संघटनात्मक ताकद वाढली असून, चारपैकी दोन नगरपालिका जिंकण्यात पक्षाला यश मिळाले आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. अभिजित मोरे यांना विधान परिषदेचे तिकीट देऊन संधी द्यावी, अशी ठाम मागणी कार्यकर्त्यांनी केली. यावर शिवाजीराव गरजे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याची माहिती मिळाली आहे.



# पालेशा महाविद्यालयात जागतिक वाचन दिवस साजरा

**धुळे, दि.२४- धुळे एज्युकेशन सोसायटीच्या मा.ध पालेषा वाणिज्य कला व विज्ञान महाविद्यालयात जागतिक वाचन दिवस साजरा करण्यात आला.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रभाकर महाले सर होते. महाविद्यालयातील शिक्षक प्राध्यापक व इतर सहकारी कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्राध्यापक ग्रंथपाल कविता वाघ मॅडम यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ.प्रभाकर महाले सरांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर अध्यक्ष यांनी याप्रसंगी प्राचार्य डॉ. प्रभाकर महाले सरांनी मुलांना आपल्या जीवनात पुस्तकांचे आणि वाचन करण्याचे अमूल्य साधारण महत्त्व आहे हे समजावून सांगितले व त्यांना पुस्तकं वाचण्यास प्रेरित केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन प्राध्यापक कविता वाघ यांनी केले. कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. प्रभाकर महाले, प्रा.डॉ.हेमंत जोशी, प्रा.एम एम मून, प्रा.शुभम सुरवाडे, प्रा.डॉ.कुशल चौधरी, प्रा.जैन, प्रा.डॉ.सुषमा सबनीस, प्रा.रक्षंदा जाधव, प्रा.कविता वाघ, भूषण सूर्यवंशी, मुरली जोशी, ऋषिकेश बापट, मुकुंद कुलकर्णी तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# पोद्दार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्याने पटकावले ब्राँझ पदक

**धुळे, दि.२४- शहरातील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्तरावरील विज्ञान स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत शहराचा मान उंचावला आहे.**

ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशन यांच्या वतीने आयोजित डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०२५-२६ मध्ये कुमार जयकृष्ण उज्ज्वल खोपडे या विद्यार्थ्याने उत्कृष्ट कामगिरी करत ब्राँझ पदक पटकावले आहे.

जयकृष्ण हा इयत्ता वीचा विद्यार्थी असून नाशिक विभागातून त्याने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. विज्ञान विषयातील त्याची सखोल समज, प्रयोगशील वृत्ती आणि सातत्यपूर्ण मेहनत यामुळे त्याला हा मानाचा सन्मान मिळाला आहे. परीक्षेसाठी त्याला सहज इन्स्टिटयूट तसेच शाळेचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. देशभरातील हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत विविध टप्प्यांतून निवड होत अंतिम फेरीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना गौरविण्यात आले. जयकृष्णने या सर्व टप्प्यांत आपली छाप पाडत बालवैज्ञानिक हा किताबही मिळवला. या यशाबद्दल शाळेचे शिक्षक, पालक व धुळेकरांनी त्याचे अभिनंदन केले असून, जयकृष्णचे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## मंत्री रावल यांच्या अध्यक्षतेखाली समिती

मुंबई, दि.२४- विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या नावांची पद्म पुरस्कार २०२७ साठी शिफारस करण्याकरिता शासनाने राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समितीची स्थापना केली आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ही समिती गठीत करण्यात आली असून, प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी २०२७ रोजी जाहीर होणाऱ्या पद्म पुरस्कारांसाठी व्यक्तींची नावे केंद्र शासनाकडे पाठविण्याची जबाबदारी या समितीवर सोपविण्यात आली आहे. यासंदर्भातील शासननिर्णय निर्गमित करण्यात आला आहे.या समितीमध्ये वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे.

# कुलरचा वापर वाढला; पण सुरक्षितता विसरू नका महावितरणचे नागरिकांना सजग राहण्याचे आवाहन

**धुळे, दि.२४- उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत असल्याने घराघरांत कुलरचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाला आहे. मात्र, योग्य खबरदारी न घेतल्यास कुलरमुळे विद्युत अपघात होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे नागरिकांनी कुलर वापरताना आवश्यक विद्युत सुरक्षिततेचे नियम पाळण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.**

कुलर वापरताना नेहमी थ्री-पिन प्लगचा वापर करणे अत्यावश्यक आहे. कुलरमध्ये पाणी भरण्यापूर्वी वीजपुरवठा पूर्णपणे बंद करून प्लग काढणे गरजेचे आहे. तसेच पाणी भरताना ते बाहेर सांडणार नाही याची काळजी घ्यावी, कारण ओलसर जमीन आणि वीज यांचा संपर्क धोकादायक ठरू शकतो.कुलर चालू असताना त्याच्या कोणत्याही भागाला स्पर्श करू नये आणि ओल्या हाताने कुलर हाताळणे टाळावे. कुलरचे वायरिंग आणि कनेक्शन अधिकृत तज्ञांकडून तपासून घेणे तसेच योग्य अर्थिंग केल्याची खात्री करणे अत्यंत गरजेचे आहे. योग्य अर्थिंगमुळे लिकेज करंटपासून संरक्षण मिळते. लहान मुलांच्या सुरक्षेकडे विशेष लक्ष द्यावे. मुलांना कुलरपासून दूर ठेवणे आणि त्यांना कुलरजवळ खेळू न देणे आवश्यक आहे. याशिवाय, खराब किंवा जीर्ण वायर त्वरित बदलणे, कुलर हलवताना प्लग काढणे, तसेच दुरुस्ती करताना वीजपुरवठा बंद ठेवणे यांसारख्या साध्या पण महत्त्वाच्या गोष्टींची अंमलबजावणी करावी. घरामध्ये अर्थ लिकेज सर्किट ब्रेकर बसवणेही सुरक्षिततेसाठी फायदेशीर ठरते. पाण्याचा पंप ठराविक वेळ चालू-बंद ठेवणारे सर्किट वापरल्यास वीज बचत होऊ शकते. थोडीशी दक्षता आणि योग्य उपाययोजना केल्यास कुलरचा वापर सुरक्षित आणि अपघातमुक्त होऊ शकतो, असे सांगत महावितरणने नागरिकांना या नियमांचे कटाक्षाने पालन करण्याचे आवाहन केले आहे.

# आ.संजय गायकवाडांचे विधान विकृत व गुन्हेगारी स्वरुपाचे : हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई, दि.२४- शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी शिवाजी कोण होता? या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना अर्वाच्च भाषेत शिविगाळ केलीच पण त्यांची भाषा अत्यंत घाणेरडी, विकृत व गुन्हेगारी प्रवृत्तीची आहे. आमदार गायकवाड यांनी यावेळी कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्येबाबतही भाष्य केलेले आहे, अशा विकृत व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या आमदारावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कारवाई करण्यास का घाबरतात?, असा प्रश्न महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी विचारला आहे.**

गांधी भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, आमदार संजय गायकवाड हे सातत्याने दादागिरी व गुंडगिरी करत असतात. आमदार कॅन्टिनमध्ये कामगारांना मारहाण करणे, बुलढाण्यात वाळू तस्करी, जबरदस्तीने जमीन बळकावणे, कोणालाही अत्यंत खालच्या भाषेत शिविगाळ करणे, ही त्यांची गुन्हेगारी कृत्ये सुरुच आहेत. एवढेच काय तर भाजपा हा हिजड्यांचा पक्ष आहे, देवेंद्र फडणवीस यांच्या तोंडात कोरोनाचे जंतू सोडा, राहुल गांधी यांची जीभ छाटणाऱ्यास लाखांचे बक्षीस देऊ, असे प्रताप या आमदार महोदयांनी यापूर्वी केले आहेत. फडणवीस यांच्यात हिम्मत असेल तर त्यांनी त्यांच्या पक्षाला दिलेल्या शिव्यांची तरी दखल घेऊन आमदार संजय गायकवाड यांच्यावर कठोर कारवाई करायला हवी, पण मुख्यमंत्री मात्र या आमदाराला पाठीशी घालत आहेत.

पान ३ वरुन

## ..दहा पैकी सात खासदार भाजपात

आमदार केले, खासदार केले काय-काय दिले नाही. पंजाबच्या जनतेने राज्यसभेत पाठवले आणि तुम्ही भाजपच्या कुशीत पोहोचला. संदीप पाठक यांना पंजाबच्या जनतेने राज्यसभेत पाठवले. मोठ्या जबाबदाऱ्या पक्षाने दिल्या, असे संजयसिंह म्हणाले. हरभजन सिंगला संसदेत पाठवण्याचं काम केलं. मात्र, सात जणांनी पंजाबसोबत गद्दारी करण्याचं काम केलं आहे. पंजाबच्या चांगल्या सरकारला रोखण्याचे काम त्यांनी केले आहे, असे संजय सिंह म्हणाले. आमच्या खासदारांना फोडले जाते त्यांना पक्षात घेतले जात आहे. काही दिवसांपूर्वी अशोक मित्तल यांच्याकडे ईडीचा छापा पडला होता. या गोष्टी जुळून येतात. ईडीचा छापा पडला आणि फोडले, याचा अर्थ भीती दाखवून, प्रशासनाचा दुरुपयोग करुन ऑपरेशन लोटस चालवले जाते. पण, पंजाबची जनता गद्दारांना माफ करणार नाही, असे संजयसिंह म्हणाले.

भाजपमध्ये सात खासदार विलीन

आम आदमी पक्षाचे राघव चड्ढा, राजिंदर गुप्ता, अशोककुमार मित्तल, संदीप पाठक, विक्रमजीतसिंग सहानी, हरभजन सिंग, स्वाती मालीवाल हे सात खासदार पक्ष सोडून भारतीय जनता पक्षात सहभागी झाले आहेत. त्यामुळे आता आम आदमी पक्षात राज्यसभोचे संत बलबीरसिंग, संजयसिंग आणि नरेन गुप्ता हे तीन खासदार राहिले आहेत.

## फडणवीस यांच्या हस्ते आज उद्घाटन

देण्यात आले आहेत. १७ मेजर ऑपरेशन थिएटर, ९ मायनर ऑपरेशन थिएटर, ड्रेगर मॉड्युलर प्रणालीसह, आधुनिक नेस्थेसिया यांसारख्या सुविधा आहेत. संपूर्ण रुग्णालयात कुशल मनुष्यबळ असून तब्बल १५० डॉक्टर्स, १५० नर्सिंग स्टाफ आणि १५० इतर सहकर्मचारी असा जवळपास एकूण ३१०० जणांचा स्टाफ रुग्णांच्या सेवेसाठी तत्पर असणार आहे.

एसव्हीकेएम रुग्णालय सरकारी योजना व विमा सुविधा तसेच विविध सरकारी योजनांशी संलग्न आहे. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, ईएसआयसी, सीजीएचएस, ईसीएचएस आणि राष्ट्रीय डायलिसिस योजनांचाही लाभ रुग्णांना या रुग्णालयात घेता येणार आहे.

तपनभाई पटेल रुग्णालयातील सोयीसुविधा : जनरल मेडिसीन, जनरल व मिनिमल ऍक्सेस सर्जरी, स्त्रीरोग व प्रसूती विभाग, बालरोग व नवजात शिशू सेवा, ऑर्थोपेडिक्स व ट्रॉमा, नेत्ररोग, ईएनटी, दंत चिकित्सा, त्वचारोग, मानसोपचार, श्वसनरोग, हृदयविकार उपचार, कर्करोग उपचार, सांधेदुखी व स्पाइन सर्जरी, न्यूरोसायन्सेस, किडनी व मूत्ररोग, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी, व्हॅस्क्युलर सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, पेन मॅनेजमेंट व पॅलिएटिव्ह केअर, आहारतज्ज्ञ सेवा, आपत्कालीन सेवा, फिजिओथेरपी, रेडिओलॉजी (सीटी, एमआरआय), पॅथॉलॉजी व ब्लड बँक या सुविधा उपलब्ध राहणार आहेत.

श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मार्फत संस्थेचे अध्यक्ष माजी शिक्षण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या दूरदृष्टीने सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी एस.व्ही.के.एम. संचलित तपनभाई मुकेशभाई पटेल मेमोरियल हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज व संशोधन केंद्र, खर्दे बु. ता. शिरपूर जि. धुळे येथे बेड च्या या अत्याधुनिक मल्टीस्पेशालिटी व सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे उदघाटन मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येत आहे.कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन श्री विलेपार्ले केळवणी मंडळ सहअध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, संस्थेचे उपाध्यक्ष तथा लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल सर्व विश्वस्त यांनी केले आहे.

मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांचे दि.२५ एप्रिल शनिवार रोजी दुपारी ३ वाजता शिरपूर विमानतळावर आगमन होईल. येथे स्वागत झाल्यानंतर दहिवद टेक्स्टाईल पार्क येथील एस.व्ही.के.एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे दुपारी ३.२५ वाजता उद्धाटन व पाहणी, त्यानंतर कृष्णा कोटेक्स (वर्ल्ड क्लास) व डाय हाऊस आगमन, उद्धाटन व पाहणी, नंतर प्रथ टेक्सटाईल व एसेरोला येथे आगमन, उद्धाटन (एकाच ठिकाणी) व पाहणी, त्यानंतर संध्याकाळी अलका देसाई स्कूल ऑफ नर्सिंग अँड रिसर्च सेंटर, खर्दे बु. येथे उदघाटन होईल.यानंतर स्व. तपनभाई पटेल मेमोरीयल हॉस्पीटल (खर्दे) उदघाटन सोहळा संध्याकाळी ५ वाजता होऊन पाहणी करतील. यानंतर आर.सी.पटेल फॉर्मसी कॉलेज ग्राऊंड, शिरपूर येथे संध्याकाळी ६.१५ वाजता जाहीर सभेचा कार्यक्रम होईल.या ठिकाणी स्टेजवरुन वर्च्युअल (सुदूर यंत्रणेद्वारे कृतिबेन भूपेशभाई पटेल आयुर्वेदिक कॉलेज आमोदे,एस.व्ही.के.एम्स. कॉलेज ऑफ ग्रीकल्चर व कॉलेज ऑफ फार्मसी तरडी, आर.सी.पटेल इंग्लिश मेडियम स्कूल, निमझरी नाका शिरपूरचे उदघाटन होईल. तसेच स्टेजवरुन वर्च्युअल (सुदूर यंत्रणेद्वारे) भूमिपूजन समारंभ होईल. एस.व्ही.के.एम्स. मेडिकल कॉलेज बिल्डिंग खर्दे बु. येथील भूमिपूजन, देवमोगरा माता मंदिर नटवाडे, क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा स्मारक नटवाडे, क्रांतिवीर खाज्या नाईक स्मारक नटवाडे, आ.अमरिशभाई पटेल इंटरनॅशनल ड्रायव्हींग स्कूल दहिवद येथील भूमिपूजन होणार आहे. त्यानंतर मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांचा जनकव्हिला, शिरपूर येथे मुक्काम राहणार आहे.

## महामार्ग खचल्याने पिकअप उलटली

दगावल्या. दरम्यान जामफळ -कनोली योजनेचे मातीकाम एप्रिल २०२४ पासून परिसरात माती मिळत नसल्याने पूर्णपणे बंद आहे. सन २०२६ अखेर पर्यंत सदर प्रकल्पाचे काम पूर्ण होऊन प्रकल्पात पाणीसाठा होणे अपेक्षित होते. परंतु सध्याची परिस्थिती पाहता २०२७ अखेर पर्यंतही तापी नदीचे पाणी या प्रकल्पात पोहोचण्याची शक्यता नाही. एकीकडे मुख्य काम बंद असताना, दुसरीकडे घाईघाईने जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

अपघात झाल्यानंतर ठेकेदार कंपनीने तातडीने खड्डा सिमेंटने भरून त्याभोवती लाल रंगाचे लहान सुरक्षा स्तंभ (रिफ्लेक्टर) उभे केले आहेत. मात्र, यामुळे शिरपूरकडे जाणाऱ्या मार्गिकेवर वाहनांसाठी अत्यंत कमी जागा शिल्लक राहिली आहे. रात्रीच्या वेळी हे अडथळे नीट न दिसल्यास पुन्हा मोठ्या अपघाताची शक्यता वर्तवण्यात येत असून महामार्गासारख्या अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी काम करताना तांत्रिक खबरदारी घेणे आवश्यक असतानाही, अशा प्रकारची दुर्घटना घडल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## ..अखेर शेतकऱ्यांचा विजय

या प्रकरणी महाराष्ट्र विधानमंडळ अनुसूचित जमाती कल्याण समितीकडेही निवेदन देण्यात आले होते.

दरम्यान, आज तहसील कार्यालयात प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी तथा तहसीलदार शिवांश सिंग यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची बैठक पार पडली. बैठकीला समितीचे पदाधिकारी, बाधित शेतकरी व कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.बैठकीदरम्यान तहसीलदारांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरत शेतकऱ्यांना तात्काळ मोबदला देण्याचे आदेश दिले. या निर्णयामुळे कंपनीवर दबाव वाढला असून, शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. प्रशासनाच्या आदेशानुसार येत्या सोमवारपासून नुकसानभरपाई वितरण प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या संघर्षाचा शेवट सकारात्मक होण्याची चिन्हे दिसत आहेत.एकीकडे हा निर्णय आदिवासी हक्कांच्या लढ्याचा महत्त्वाचा टप्पा मानला जात असताना, अशा प्रकरणांत प्रशासनाने वेळेत हस्तक्षेप करणे आवश्यक असल्याचेही अधोरेखित होत आहे.

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रवण दत्त यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

पान ३ वरुन

## ...जागा वाढवून मिळण्यासाठी

ही समस्या सोडवण्यासाठी दुकानांच्या मागे असलेल्या पालिकेच्या पाण्याच्या टाकीकडील रिक्त जागेपैकी किमान ५ फूट जागा वाढवून मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे.व्यावसायिकांनी स्पष्ट केले की, पाण्याच्या टाकीला लागून कोणतेही पक्के बांधकाम नसल्याने ही ५ फूट जागा वाढवून दिल्यास पालिकेचे कोणतेही तांत्रिक नुकसान होणार नाही. उलट, जागा वाढवून मिळाल्यास नगरपालिका नियमानुसार वाढीव वार्षिक कर भरण्यास सर्व चर्मकार व्यावसायिक तयार आहेत. यामुळे शहराचे विद्रुपीकरण थांबण्यास आणि शिस्तबद्ध व्यवसाय करण्यास मदत होईल.

हे निवेदन देताना चर्मकार समाजाचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक हिरालाल सोमा अहिरे, सचिव तुकाराम गबा अहिरे यांच्यासह प्रकाश मोतीलाल अहिरे, मंगल चिंधू अहिरे, चिंधू गिरधर अहिरे, गुताबाई फकीर अहिरे, मनोज अर्जुन अहिरे, चंद्रकांत लक्ष्मण अहिरे, सुभाष चिंतामण अहिरे, गबा चिंतामण अहिरे, गोविंद मधुकर अहिरे, सुमनबाई मधुकर अहिरे, सोनू गोपाल अहिरे यांसह अनेक समाज बांधव उपस्थित होते.उपनगराध्यक्षा सौ.माधवीताई पाटील यांनी या प्रश्नी सकारात्मक विचार करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.

## वाढलेल्या मतदारांची आयोगाने

होते. यावेळी पुढे बोलतांना सोमय्या म्हणाले की, पश्चिम बंगालमध्ये पंच्याऐंशी ते ब्याण्णव टक्के मतदान झाले. त्याबद्दल निवडणुक आयोगाचे अभिनंदन. राज्यातील सर्वच जिल्ह्यात बाहेरच्या मतदारांची घुसखोरी उघड होते आहे. वाढीव मतदारांची कठोर तपासणी झाली पाहिजे. मतदार याद्यांमध्ये फोटो एक नावे वेगवेगळी, पत्ता वेगळा असा कारनामा केल्याचे समोर येत आहे. मतदार यादीत घोळ करणाऱ्या बिएलओंवरही कारवाई होणार आहे. विविध मतदार संघांमध्ये बनावट, घुसखोर मतदारांना बाहेर काढण हा उद्देश असल्याचेही सोमय्या यांनी स्पष्ट केले.

घुसखोर मोठ्या प्रमाणावर- आ.अनुप अग्रवाल

मुस्लीम परिसरातील एसआयआर स्कॅनिंग रात्री २.३० ते ३ वाजेच्या सुमारास सुरू असते. मतदार यादीत फोटो एकच, इपीक आयडी, पत्ते वेगवेगळे अशी एकुण तीन हजार पाचशे नावे मॅपच्या माध्यमातून उघड झाली आहेत. बनावट मतदान, मयतांच्या नावाचाही मतदार यादीच समावेश असल्याचे उघड झाले आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे २००९ ची मतदार यादी मागीतली परंतु अद्याप मतदार यादी देण्यात आली नाही. धुळे शहरात बांगलादेशी घुसखोरांचा समावेश आहे. निवडणुक आयोग यावर कारवाई करणार का ? याकडे लक्ष देणं गरजेची आहे. नवीन स्कॅम अर्थात घोटाळ्याबाबत उद्या किंवा परवा माहिती देणार असल्याचेही आ. अनुप अग्रवाल यांनी पत्रकार परिषदेप्रसंगी सांगितले.

## आ.गायकवाडांचा राजीनामा घ्या

दाखल करावे आणि अटक करावी. पानसरे यांच्या हत्येप्रकरणी आ.गायकवाड यांचीही चौकशी व्हावी अशी मागणी निवेदनातून केली आहे. निवेदन देतांना कॉ.वसंतराव पाटील, कॉ.हिरालाल परदेशी, कॉ. साहेबराव पाटील, कॉ.पोपटराव चौधरी, कॉ.संतोष पाटील, कॉ.बुधा पावरा, कॉ.नाना पाटील, कॉ.शंकरराव पाटील,कॉ.पितांबर पाटील, कॉ.सुधाकर पाटील, कॉ.बापू गर्दे,कॉ. प्रदीप सोनवणे उपस्थित होते.

# पेट्रोल पंपावर हाणामारी महिलेचा विनयभंग

धुळे, दि.२४- शहरातील एस.टी.महामंडळाच्या पेट्रोल पंपावर कर्मचाऱ्यास दोन अनोळखी तरूणांनी शिवीगाळ करत मारहाण केली तसेच वाद सोडविण्यासाठी आलेल्या महिलेचा विनयभंग केल्याची घटना घडली. महिला कर्मचाऱ्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, एस.टी. महामंडळाच्या पेट्रोलपंपवर दि.२१ एप्रिल रोजी रात्री ८.३० वाजेच्या सुमारास दोन तरूणांनी कर्मचारी कमलेश अशोक मुर्तडक यांच्याशी वाद घातला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी वाद मिटविण्यासाठी आलेल्या महिला लिपीक सोबतही असभ्य वर्तन करून विनयभंग केला. या प्रकरणी दोघांविरोधात शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शहाद्यातील पत्रकार नुपूर पाटील हिची मंत्रालयात स्तुत्य निवड

**शहादा, दि.२४ (का.प्र.)- तालुक्यातील गुजर समाजातील सुपुत्री कुमारी नुपूर पाटील यांची मुंबई मंत्रालयात डायरेक्टोरेट जनरल ऑफ इन्फॉर्मेशन अँड पब्लिक रिलेशन्स विभागात नियुक्ती झाल्याबद्दल तिचे सर्वत्र कौतूक होत आहे.**



शहादा तालुक्यातील मामाचे मोहिदा येथील स्व.जाधव दगडू पाटील यांची परंपरा आणि संस्कारांची श्रीमंती लाभलेले कुटुंबातील मधुकर जाधव पाटील, ज्यांचा मुख्य व्यवसाय शेती असून परिश्रम, प्रामाणिकपणा आणि मूल्यांची जपणूक ही त्यांची ओळख आहे. त्यांच्या सहचारिणी सौ. नीलिमा मधुकर पाटील या वाल्मिकी माध्यमिक विद्यालय पुरुषोत्तम नगर येथे शिक्षिका म्हणून कार्यरत असून शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या घडणीत मोलाचे योगदान देत आहेत. अशा सुसंस्कारित कुटुंबातील जेष्ठ कन्या, तसेच नांदरखेडा येथील सुदाम भाईदास पाटील यांची नात कुमारी नुपूर नीलिमा मधुकर पाटील हिने आपल्या कर्तृत्वाने आणि मेहनतीने एक उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या डायरेक्टोरेट जनरल ऑफ इन्फॉर्मेशन अँड पब्लिक रिलेशन (मंत्रालय, मुंबई) येथे मनवं माध्यम विभागात मकंन्टेन्ट रायटर व क्रिएटरफ म्हणून तिची नियुक्ती झाली आहे. ही जबाबदारी प्राप्त झालेल्या व हा कार्यभार सांभाळणाऱ्या त्या लेवागुजर समाजातील एकमेव महिला भगिनी आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून मराठी वृत्तवाहिन्या आणि वर्तमानपत्रांमधून पत्रकार म्हणून कार्य करत आपल्या लेखणीतून समाजाचे प्रश्न, विचार आणि वास्तव प्रभावीपणे मांडणारी कु. नुपूर पाटील ही लेवा पाटीदार गुजर समाजातील एक सक्रिय आणि जागरूक महिला पत्रकार म्हणून ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरली आहे. तिच्या या यशामध्ये तिची जिद्द, अभ्यासू वृत्ती आणि कुटुंबियांचे पाठबळ यांचा मोठा वाटा आहे. मंत्रालयातील ही नवीन जबाबदारी केवळ तिच्यासाठीच नव्हे तर संपूर्ण समाजासाठी अभिमानाची आणि प्रेरणेची बाब आहे.कुमारी नुपूर पाटील हिला या नवीन जबाबदारीसाठी शहादा परिसरातील विविध स्तरातून हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# रस्त्यासाठी ग्रा.पं.समोर सरण रचून आंदोलन



**नांदेड, दि.२४- सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या दापशेड ता. लोहा येथे स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता नाही म्हणून गावकऱ्यांनी चक्क ग्रामपंचायतीसमोर सरण रचून दि. २४ एप्रिल रोजी आंदोलन केले. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन आंदोलकांशी संवाद साधल्यानंतर गावातील तणाव निवळला.**

लोहा तालुक्यातील दापशेड येथे स्मशानभूमीकडे जाण्यासाठी जवळचा रस्ता नाही, या कारणावरून ग्रामपंचायतकडे अनेक वेळा नागरिकांनी रस्त्याची मागणी केली. मात्र जवळचा रस्ता किंवा स्मशानभूमीला गावाजवळ जागा मिळाली नाही. त्यामुळे २४ एप्रिल रोजी सकाळी चक्क ग्रामपंचायतीसमोर सरण रचून गावकऱ्यांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन नागरिकांना समजावून सांगितले. त्यामुळे आंदोलन निवळले. स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता लांब पडत असल्याचे कारण नागरिकांनी समोर केले आहे. गावाजवळ जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी गावकऱ्यांनी ग्रामपंचायतीकडे केली आहे. या घटनेवरून गावात काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. सहाय्यक पोलीस निरीक्षक माने यांनी मध्यस्थी करून नागरिकांना शांततेचे आवाहन केले आहे. गावात पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

## जाहीर नोटीस

प्रति,

२. श्री.शिवाजी बाबुराव पवार, प्लॉट नं.४१, जी.टी.बापुजी कॉलनी, देवपूर, धुळे ता.जि.धुळे
३. श्री.मधुकर भोजू शिरसाठ, राजेंद्र छात्रालय, देवपूर, धुळे. ता.जि.धुळे,
४. श्री.सारांश महेंद्र भावसार, २५, सदगुरू कॉलनी, विद्यानगरी, देवपूर, धुळे. ता.जि.धुळे,
५. श्री.राकेश लक्ष्मण कुलेवार, प्लॉट नं.०६, जगदिशनगर, मोगलाई, साक्री रोड, धुळे. ता.जि.धुळे
६. श्री.सुनील तुळशीराम, प्लॉट नं.५२, सिध्दार्थ नगर, चितोड रोड, धुळे. ता.जि.धुळे
७. श्रीमती कविता शरद कोळी, प्लॉट नं.१०, झेड.पी. कॉलनी, स्वामी नारायण रोड, देवपूर, धुळे. ता. जि. धुळे
८. श्री.देवेन हेमंत शेळके, भागा मोहन नगर, वाखारकरनगर जवळ, धुळे. ता.जि.धुळे
९. श्री.रामचंद्र राजेश्वर कोर, जयहिंद मंगल कार्यालय समोर, जयहिंद कॉलनी, देवपूर, धुळे. ता.जि.धुळे
१०. श्री.अमृतराव बाबुराव पवार, प्लॉट नं.२०, विद्यानगर, देवपूर, धुळे. ता.जि.धुळे
११. श्री.महेंद्र मधुकर भावसार, प्लॉट नं.२५, सदगुरू कॉलनी, विद्यानगरी, देवपूर, धुळे, ता.जि.धुळे
१२. श्री.चंद्रशेखर आत्माराम पाटील, ४-बी, पत्रकार कॉलनी, चंपाबाग, साक्री रोड, धुळे. ता.जि.धुळे
१३. श्री.रविंद्र नामदेव इंगळे, प्लॉट नं.७५, फोरेस्ट कॉलनी, नगावबारी, देवपूर, धुळे, ता.जि.धुळे
१४. श्री.प्रवीण हिम्मतराव पाटील, प्लॉट नं.४०, संपदानगर, देवपूर, धुळे. ता.जि.धुळे
१५. श्री.राजेश्वर डोंगर पाटील, प्लॉट नं.७५, शिवनेर, जयहिंद कॉलनी, देवपूर, धुळे. ता.जि.धुळे
१६. श्री.योगेंद्र पूनमचंद जुनागडे, प्लॉट नं.१३, पत्रकार कॉलनी, चंपाबाग, साक्री रोड, धुळे. ता.जि.धुळे
१७. डॉ.दिपक आबाजी पाटील, प्लॉट नं.०२, सुयोग कॉलनी, जुना आग्रा रोड, देवपूर, धुळे. ता.जि.धुळे
१८. श्री.नवल चैत्राम पाटील, गुरूदत्त कॉलनी, पंचायत समिती जवळ, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे. ता.जि.धुळे
१९. श्री.गिरीधर गोविंद देसले, अरूणोदयनगर, रामनगर जवळ, शिवराई चौक, गोळीबार टेकडी, धुळे. ता.जि.धुळे
२०. सौ.शुभदा गिरीष ठाकरे, १९, भागीरथ, एल.आय.सी. कॉलनी, धुळे. ता.जि.धुळे
२१. श्री.सुरेश उत्तमचंद देर्सडा, गांधीनगर, प्रकाश टाकीज मागे, धुळे. ता.जि.धुळे

**विषय-** मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्रं.३९५३/२०२६ संदर्भात दि.०४/०५/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता हजर राहणे बाबत सूचना पत्र.

**संदर्भ-** मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथील याचिका क्रं.३९५३/२०२६ मधील आदेश दि.२०/०४/२०२६.

**महोदय,**

१. मा.धर्मदाय सह.आयुक्त-२, नाशिक विभाग, नाशिक यांचे, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ४७ नुसार सादर करण्यात आलेला अर्ज क्रं.१५/२०२६ मधील निशाणी क्रं.०७ वरील आदेश दि.२०/०३/२०२६ नुसार, वरील अर्ज क्रं.१५/२०२६ च्या अंतीम न्यायनिर्णया पर्यंत विद्यावर्धिनी सभा, धुळे नोंदणी क्रं.एफ-६७/धुळे या न्यासाबाबत सामनेवाले आथवा कोणीही गव्हर्निंग कौन्सील पदाधिकारी/विश्वस्त मंडळ यांची निवडणूक घेवू नये, या आदेशास मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे याचीका सादर असून त्यात वरील आदेशास आव्हान दिले आहे.
२. दरील याचीकेत दि.२०/०४/२०२६ रोजी सुनावणी होवून, प्रकरणात प्रतिवादींना नोटीस काढून प्रकरण दि.०४/०५/२०२६ रोजी सुनावणी अंती अंतीम रित्या निकाली काढण्यासाठी ठेवण्यात आले आहे. त्याचप्रमाणे याचीकेतील अर्जदारास खाजगी नोटीस पाठविण्याची मुभा देण्यात आली आहे. तसेच मा.धर्मदाय सह आयुक्त यांच्या कार्यालयात प्रलंबीत प्रकरण क्रं.१५/२०२६ मध्ये याचीका कर्त्यांनी मुदतवाढीचा अर्ज दिल्यास, तो विचारात घ्यावा असेही आदेश करण्यात आले आहे. त्या मागील उददेश दिसून येतो की, प्रकरण क्रं.१५/२०२६ जर प्रस्तूत याचीका प्रलंबीत आसतांना निकाली काढले तर याचीका निष्फळ होवू नये.
३. तरी मा. उच्च न्यायालयातील याचीका क्रं.३९५३/२०२६ मधील दि.२०/०४/२०२६ च्या आदेशानुसार आपणास या सूचनापत्रा आधारे कळविण्यात येते की, आपण प्रस्तूत पत्र मिळताच दि.०४/०५/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे स्वतः आथवा विधिज्ञा मार्फत आपली बाजु मांडण्यासाठी उपस्थित रहावे. आपण उपस्थीत राहीला नाहीत तर न्यायालयामार्फत प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याची शक्यता नाकारता येत नाही.
४. तरी आपण या सूचनापत्रातील परिच्छेद क्रं.१ ते ३ मधील मजकूर विचारात घेवून, दि.०४/०५/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, (औरंगाबाद) छत्रपती संभाजीनगर येथे न्यायालयाच्या दि.२०/०४/२०२६ च्या आदेशानुसार न्यायालयात हजर होवून नियमानुसार कार्यवाही करावी.

करीता हे सूचनापत्र पाठविण्यात येत आहे.

**ठिकाण- धुळे, दिनांक-२३/०४/२०२६**

आपला विश्वासू
जगदिश आप्पाजी गायकवाड
रा.गवळीवाडा, मोगलाई, धुळे, ता.धुळे, जि.धुळे.


**REQUIREMENT**

**Parivar** Brand Edible oil & Soya nuggets company requires following persons.

- Fire Officer
- Safety Officer (B.Sc. + ADIS)
- Chemist
- Store Keeper

Above vacancy for young dynamic person want to Grow with us; Interested candidates may send their Applications with Bio-data within **3** days to our
email id:- hr@deesan.com; personnel@deesan.com

Whatsapp No.:- +91 8411818525

Add.:- The Deesan Agro Tech Pvt Ltd.
A – 1/2, M.I.D.C., Dhule – 424006
Phone No. :- 02562 – 288927 , 288919

**पाहिजेत**
Milk Processing Plant साठी Dairy Technologist पाहिजेत.
पत्ता - अग्रसेन चौकजवळ, धुळे
8879442989

**पाहिजेत**
FMCG मध्ये डिलिव्हरीसाठी इंग्रजी वाचता लिहता येणारे ड्रायव्हर पाहिजेत.
पत्ता - अग्रसेन चौकजवळ, धुळे
8767674975

**प्लॉट विकणे आहे**
बिलाडी रोड लगत सर्व्हे नं.८६ मधील २० बाय १०० फुट आकाराचा २५०० चौ.फुट क्लिअर टायटल असलेला प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
9503960587
9421460587

**घर विकणे आहे**
समतानगर दुध डेअरी रोड, स.नं.४८८/१, प्लॉट नं.७ चे १७९८ उत्तरेकडील ८०० चौफुट बांधकाम विकणे आहे.
-: संपर्क :-
9403088529
9420814159

**मुले पाहिजेत**
विकास दुध (पाऊच पॅकींग) वाटपासाठी पाटाईम मुले पाहिजेत.
समक्ष भेटा. स. ११ ते १२
विकास दुध, १४८४ नवग्रही ग.नं.२, पारोळा रोड, उषा ड्रेसेस समोर, धुळे
9890030422
8600773021

**पाहिजेत**
कामासाठी पाहिजे
सेल्समन - २
सेल्सगर्ल - २
श्याम वॉच ॲण्ड गिफ्ट सेंटर
फुलवाला चौक, धुळे
7219036785
9960777594

**बंगला भाड्याने देणे**
ऑफिससाठी सहा रुमचा बंगला भाड्याने देणे आहे.
जी.टी.पी. स्टॉप ३४, बडगुजर कॉलनी, देवपुर, धुळे
-: संपर्क :-
9028111356

**पाहिजेत**
कापड दुकानामध्ये माल जोडणेसाठी मुले-मुली, महिला पाहिजेत. व सेल्समनही हवेत.
समक्ष भेटा- राकेश कापड दुकान, जेबी रोड, धुळे
9423941247

**बंगला भाड्याने देणे**
सर्व सोयीयुक्त बंगला ४ व्हीलर पार्कींग, २४ तास पाणी, गार्डन, रोडटच, भरत नगर देवपुर, धुळे
-: संपर्क :-
9011237323
9421617354

**शेण खत विकणे आहे**
दोंडाईचा येथील गौशाळेचे(देशी गायी) शेण खत विकणे आहे.
राहुल पाटील
8329300690
9421527513

**WE ARE HIRING FOR**
MANAGER : 1 POST (MALE)
(FIRST PREFERENCE WOULD BE GIVEN TO PEOPLE HAVING LIQUOR EXPERIENCE)
JUNIOR ACCOUNT OFFICER :- 1 POST
COMPUTAR OPERATOR :- 1 POST
LOCATION - JAIN VIHAR, BESIDE CALKATTA PUNJAB DHABA NEAR AVDHAN TOLL PLAZA, AVDHAN, DHULE
MO - 7038181857 / 9403720025

**आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...**

atomberg "Why not?"





क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?
इंडक्शन मोटर वह मोटर है, जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमें 75 वॉट बिजली की खपत होती है.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती है. इससे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे 3* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरूरत नहीं होती है !
SAVES UP TO ₹1500 IN A YEAR
100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE

59 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोनः 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०